साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य
२३५
४

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्र/२३५
१
मं. सा. ळ क.

मराठीसाठी
जलदलिपी

# शीघ्रनागरी

संशोधक

डॉ. श्री. वा. भागवत

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई

म. रा. सा. सं. म. ग्रंथालय
मंत्रालय

## मराठीसाठी जलदलिपी

# शीघ्रनागरी

संशोधक

डॉ. श्री. वा. भागवत

साहित्य–संस्कृति–मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रकाशक :
सचिव,
साहित्य–संस्कृति–मंडळ, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ३२

© प्रकाशकाधीन

प्रथम आवृत्ती
१ मे १९८४

किंमत रु. १८–००

मुद्रक :
का. गं. सोनार, एल्पी. एम्. प्रिंटिंग
लोकसंग्रह मुद्रणालय
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| निवेदन | एक |
| डॉ. सु. मं. कत्रे यांचा पुरस्कार (फोरवर्ड) | तीन |
| प्रास्ताविक | पाच |
| सुरुवातीचे थोडेसे | १ |
| पाठ क्रमांक | |
| १. मूळ शीघ्राक्षरे; परिचयचित्रे | ३ |
| २. साधित शीघ्राक्षरे; शब्दलेखनाचे नियम; विरामचिन्हे; आवर्तने | ७ |
| ३. स्वर आ; आवृत्त काढण्याचे नियम | ११ |
| ४. स्वर 'इ–ई'; शब्दान्ती स्वरोत्तर ई | १५ |
| ५. स्वर ए-ऐ; | १८ |
| जलदवाचन पाठ १ ला | २० |
| ६. स्वर ऊ; ऊ-ऊन प्रत्यय; ई-ऊ-चे-ऱ्हस्वदीर्घत्त्व; | २२ |
| ७. स्वर ओ; तू-तो; लू-लो; तीव्र कोनावर सुटे स्वर | २६ |
| ८. औ; क्ष-ज्ञ; न्ह-म्ह-ण्ह-ऱ्ह-ल्ह-व्ह; लवचिक कोरी | २९ |
| ९. आद्य अ; तंतोतंत अभ्यस्त; ताना; संक्षिप्ते कशी होतात? | ३२ |
| १०. साया; सायाह्नक; सायाग्र | ३५ |

जलदवाचन पाठ २ रा ३८

११. अनुस्वार; षष्ठीचे अनेकवचन; सुलभुक ४०

१२. त-चे रेखाकुर; सुलभवळण पस-सप; यला-वयाला-णार ४४

१३. न-च-चे रेखांकुर; पण-क्षण; लक्षवेधी च; वळण पह-पाह ४८

१४. उत्तरवर्ण र; ऋ; णे-ण्या ५२

१५. पूर्ववर्ण र; ई-ईल-एल; वळण वस; विसर्ग ५६

जलदवाचन पाठ ३ रा ५९

१६. पूर्ववर्ण स: स्त-स्थ; स्प-स्फ; स्व; प्रयोजक रूपे, णुक-वणुक, ६३

१७. व्यंजनयुग्मे; वळण पर; अभ्यस्तांचे प्रत्यय ६७

१८. नकारात्मक क्रियापदे; 'वार'; नावाची आद्याक्षरे; पूर्ववर्ण प ७१

१९. उत्तरवर्ण य; ॲ-ऑ; संख्यालेखन; ७५

२०. उत्तरवर्ण द; स्वतः साधावयाची संक्षिप्ते ८०

शेवटचे सहा जलदवाचन पाठ ८१

परिशिष्ट–१ १०२

परिशिष्ट–२ १०३

परिशिष्ट–३ ११२

# निवेदन

महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी करण्याच्या व सर्व पत्रव्यवहार मराठीतून करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयामुळे मराठी लघु-लेखकांची जास्तीतजास्त जरुरी भासू लागली. त्यामुळे मराठी शीघ्रलिपीसाठी वेगवेगळ्या लेखकांनी वेगवेगळी शीघ्रलिपी शोधून काढण्याचा प्रयत्न केला. मराठी शीघ्रलिपी जास्तीतजास्त सुटसुटीत व शीघ्रलेखकास समजण्यास तसेच उतरवून घेण्यास सोपी जावी हा या ग्रंथामागील हेतु. श्री. श्री. वा. भागवत यांच्या संशोधनामुळे मंडळास आपला एक उद्देश साध्य करिता आला. आज या पुस्तकाचे प्रकाशन मंडळातर्फे होत आहे. ही आनंदाची गोष्ट.

आज मराठी लघुलेखन करण्याच्या काही पद्धती अस्तित्वात आहेत. ह्या सर्व पिट्मन व इतर परदेशीय इंग्रजी पद्धतीतून जे इंग्रजी लघुलेखन निघालेले आहे त्याच्याशी निगडीत आहेत. त्यामुळे संपूर्ण मराठीशी जुळणारी आणि मराठी, हिंदी माणसाला सर्वस्वी उपयोगी पडेल अशी लघुलिपी आज अस्तित्वात नाही. श्री. भागवत ह्यांच्या संशोधनामुळे अशी लिपी मराठीला उपलब्ध होईल असे श्री. भागवत यांचे म्हणणे आहे. या लिपीचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा व त्यामुळे आपले साहित्य व कार्यवाही विकसित होण्यास मदत व्हावी हा या प्रकाशनामागील हेतु आहे.

'यशोधन'
मुंबई–४०० ०२०.
दिनांक–२ एप्रिल, १९८४.
(गुढीपाडवा)

सुरेन्द्र बारलिंगे
अध्यक्ष,
साहित्य–संस्कृति–मंडळ, महाराष्ट्र राज्य.

# FOREWORD

It is both a pleasure and a privilege to introduce to the world of scholars this short monograph by Dr. S. V. Bhagwat on — SHIGHRANAGARI, a scientifically based speed-writing, primarily designed as a system of speed-writing for Marathi, but indicative of what may be done for other Indo-Aryan and Dravidian Languages. Dr. Bhagwat qualified himself for this important work while he was fully engaged in administrative duties, first at the University of Bombay and then successively at the S.S.C. Board and Deccan College in Pune and finally at the Nagpur University as its Registrar. While at Deccan College he worked on the phonemic and syllabic frequencies of Marathi for the doctoral dissertation, later published jointly by Deccan College and Poona University which provided a model for similar studies for other languages through a Government of India sponsored project, recommended by the Kakasaheb Kalelkar Committee.

The various systems of shorthand and speed-writing which have hitherto been employed in the Indian language situation have followed blindly the western systems designed for European languages which are alphabetic; the complexities of the Indian writing system with its syllabary needs a different approach. The non-attached vowel system of western type is not suitable to Indian linguistic conditions. Final vowels are essential as indicative of gender, number, person, etc. A system of speed-writing which correctly reproduces these spoken features in writing, like Devanagari will be a proper tool in the hands of stenographers. The difficulties involved in the western shorthand systems

adopted for the Indian situation are so great that trained stenographers for these languages are not available in adequate numbers. The merit of Dr. Bhagwat's monograph on Shighranagari lies in providing a freedom from the position-writing and other difficulties mentioned in the Kalelkar Committee's Report. Having proved in his earlier dissertation that Devanagari is about 2½ times tardier than English cursive script, he has provided in this new system a way of overcoming those difficulties of learners and removed most of them; it will be seen that this Shighranagari not only derives from Devanagari but is parallel to it in many respects without its tardiness.

I feel confident that this monograph will succeed in creating an adequate number of stenographers for Marathi and will stimulate other linguistic areas to emulate Dr. Bhagwat's research to provide similar aids for their areas. The system of speed-writing must parallel the needs of each linguistic area, even when they use the same script, but with so many varying scripts and different languages, the method indicated in this monograph will have to be adapted to the needs of each linguistic and script system.

15th December, 1983. S. M. KATRE
San Jose, California

# प्रास्ताविक

आपल्याकडे लघुलेखन, त्वरालेखन, आशुलेखन, शीघ्रलेखन, गतिलेखन, जवलेखन इ. नावांनी जे ओळखले जाते ते इंग्रजीमधून आलेले 'शॉर्टहॅंड' असते. त्यातील लघुलेखन व लघुलेखक या संज्ञा आता आपल्याकडे रूढ झालेल्या आहेत. लघुलेखनाची ओळख ब्रिटिशांनी भारताला करून दिली. भारतावर त्यांची पकड पक्की झाल्यावर इंग्रजी ही राज्यप्रशासनाची भाषा झाली. प्रशासकीय कामाचा व्याप वाढू लागला तशी त्यांना लघुलेखकाची निकड भासू लागली. इंग्रजी लघुलेखक पुरेशा प्रमाणात इंग्लंडमधून इकडे येण्याचा संभव नव्हता. म्हणून त्यांनी आपली दृष्टी भारतीयांकडे वळविली. तेथवर मेकॉलेच्या विचारधारेप्रमाणे भारतात शिक्षणाची सुरुवात होऊन काही काळ लोटलेला होता. इंग्रजी शिकलेल्या भारतीय तरुणांना इंग्लंडमध्येच जन्मलेली 'पिटमन लघुलेखन पद्धती (पिलप)' शिकण्यास त्यांनी उद्युक्त केले. तेव्हापासून त्यांना पुरेसे लघुलेखक भारतीयांमधूनच मिळू लागले. कालांतराने दिल्लीत व प्रांताप्रांतांत कायदेमंडळे स्थापन झाली तेव्हा उच्च शब्दगतीने श्रुतलेखन (डिक्टेशन) घेणारे प्रतिवेदकही (रिपोर्टर्स) त्यांना अशाच तऱ्हेने मिळू लागले. ही स्थिती ब्रिटिशांना भारतातून काढता पाय घ्यावा लागेपर्यंत चालू होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इंग्रजीचे प्रथम स्थान ढळून कागदोपत्री ती दुसऱ्या क्रमांकावर गेली असली तरी प्रत्यक्षात घटकराज्यांना, त्यांची इच्छा असेपर्यंत, ती तशीच चालू ठेवण्याचा वरदहस्त मिळाल्याने प्रशासनातील तिचे स्थान आता पूर्वीपेक्षा बळकट झाले आहे, आणि तिच्याबरोबर 'पिलपचे'!

दुसऱ्या बाजूला थेट उलट चित्र आहे घटनेत उल्लेख केलेल्या चौदा भारतीय भाषांचे. राज्यभाषेची जबाबदारी स्वीकारून आपापल्या प्रदेशांत त्यांनीच सर्व कारभार करावा म्हणून १९५६ मध्ये भाषावार घटकराज्ये निर्माण झाली. पण अद्याप यातील एकही भाषा 'जैसे थे'-च्या पलीकडे सरकलेली नाही. सर्व ज्ञान-विज्ञानाचा स्रोत असलेली दीडशे विद्यापीठे आज देशात आहेत. स्वातंत्र्याच्या ३६ वर्षांच्या मुक्त वातावरणात सर्व

बाजूंनी वर्धिष्णू असणाऱ्या या पीठांपैकी एकही असे नाही की जेथे सर्व ज्ञान-शाखांतून (फॅकल्टीज) अध्ययन-अध्यापन-संशोधन प्रादेशिक भाषेतून चालू आहे ! इतर क्षेत्रांची गोष्टच नको.

**भारतीय भाषातील लघुलेखन**

प्रशासनात आवश्यक असलेल्या लघुलेखन-टंकलेखन या जोड कलांबाबत हिंदी व इतर भाषांची काय स्थिती आहे हे प्रत्यक्ष अजमावून त्या कलांच्या विकासासाठी शासनाला काही विधायक सूचना कराव्यात, या उद्देशाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने घटना समिती चालू असतानाच काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती नेमली. सर्व भाषिक प्रदेशात फिरून संबंधित स्थानिक व्यक्तींचे साक्षीपुरावे घेऊन समितीने बरीच माहिती गोळा केली व आपला अहवाल १९५१ साली केंद्राला सादर केला. हिंदी-मध्ये जवळपास वीस आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये पन्नासएक लघुलेखन पद्धती प्रकाशित झाल्या असल्याचे तिने नमूद केले आहे. त्यातील बहुतेकांनी, इकडील भाषांची वैशिष्टये लक्षात न घेता, पिलपची सहीसही नक्कल केलेली आहे. ज्या चार-दोन स्वतंत्र अशा वाटल्या त्यांची स्फूर्तीही पिलप-पासूनच आहे. अशा तऱ्हेने पिटमन ही एकच पद्धत देशात प्रचलित असूनही, देशी भाषांत पुरेसे लघुलेखक मिळत नाहीत अशी प्रत्येक भाषेची तक्रार होती व आजही आहे. आपल्या साक्षीत सर्वांनी एका गोष्टीवर विशेष भर दिला. पिलप शिकण्याला फार कठीण आहे, त्यामुळे काहींना प्रशिक्षण मध्येच सोडून द्यावे लागते. जे टिकून राहतात त्यांना दर मिनिटाला ८० ते १०० शब्दांची लेखनगती येण्यास दोन–अडीच वर्षे सहज लागतात असे समितीला सांगण्यात आले. परिणामी भारतीय भाषांतून पुरेशा संख्येने लघुलेखक मिळत नाहीत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात दोस्त राष्ट्रांचे तळ जगभर पसरलेले होते. संरक्षक दलातील अमेरिकन जवानांना स्थानिक भाषा लवकर शिकता येऊन तेथील जनतेशी आवश्यक तो संपर्क ठेवता यावा यासाठी अमेरिकेने आपल्या भाषाशास्त्रज्ञांकडून काही स्थानिक भाषांचे छोटे छोटे अभ्यासक्रम मुद्दाम तयार करवून घेतले होते. हे अभ्यासक्रम शिकून जवानांना त्या त्या

भाषांचे कामचलाऊ ज्ञान सहा महिन्यांत करून घेता येत असे. जेथे एखाद्या परकीय भाषेची जुजबी ओळख सहा महिन्यांत होऊ शकते तेथे केवळ लघुलिपी शिकण्यासाठी दोन-अडीच वर्षे घालवावी लागणे हा कालाचा व शक्तीचा अपव्यय आहे. या कठीणपणाची कारणे शोधून काढली जावीत, भारतीय भाषांचा लिपीच्या संदर्भात भाषाशास्त्रीय अभ्यास व्हावा आणि पिलप-नंतर गेल्या दीड शतकात ज्या इतर लघुलेखन पद्धती पुढे आल्या आहेत त्यांचाही योग्य तो परामर्श इकडील लघुलेखन संशोधनात घेतला जावा अशी समितीची शिफारस होती.

कालेलकर समितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रादेशिक भाषांत लघुलेखन पद्धती बसवून घेण्यासाठी आवश्यक असलेले भाषाविषयक पूर्वसंशोधन करवून घेण्याचे काम त्या त्या प्रदेशातील एखाद्या विद्यापीठाकडे वा संशोधन संस्थेकडे सोपविण्याचे व त्यासाठी आवश्यक ते आर्थिक साह्य देण्याचे केंद्राने ठरवले. मराठीसाठी पुण्याच्या डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्थेची निवड झाली. तेथे मराठी बाबतचे अपेक्षित पूर्वसंशोधन १९५५ ते ५८ पर्यंत पार पडले. संशोधनाचे निष्कर्ष पुणे विद्यापीठ व डेक्कन कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने मार्च १९६१ मध्ये प्रबंधरूपाने * प्रसिद्ध झालेले आहेत.

### वारंवारतेचे नवे तत्त्व

भाषेतील औच्चारिक व शाब्दिक 'वारंवारता' हे जलदलेखनातील (स्पीड-रायटिंग) नवे तत्त्व आहे. वारंवारता म्हणजे काय ? ती कशी ठरवतात ? प्रत्येक भाषेत काही शब्दांचा वापर इतर शब्दांच्या मानाने अधिक होतो. अशा शब्दांना वारंवार येणारे शब्द आणि ते एकमेकांच्या तुलनेत ज्या प्रमाणात कमी-अधिक येतात त्या प्रमाणाला त्या शब्दांची वारंवारता म्हणतात. ही ठरविण्यासाठी, तज्ज्ञसंमत अशा काही तत्त्वांवर,

---

*S. V. BHAGWAT, Phonemic Frequencies in Marathi and their relation to devising a speed-script, Deccan College, Pune-6, 1961.

भाषेत प्रत्यक्ष वापरात असलेल्या शब्दांची गणती करण्यात येते. जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रांत भाषा जे शब्द वापरते त्या प्रत्येकातून 'नमुना' म्हणून काही शब्द निवडले जातात. अशा तऱ्हेने साधारण लाख शब्द जमा झाल्यावर त्यांतील सर्वांत जास्त येणारा शब्द कोणता; त्याच्या पाठोपाठ येणारे कोणते, असे करीत करीत लाखात फक्त एकदा येणारे कोणते यांची त्यांच्या वारंवारते-प्रमाणे एक सूची प्रथम तयार करण्यात येते, नंतर या मूळ सूचीपासून लिपिविषयक संशोधनाला उपयुक्त ठरणाऱ्या वर्गसूची, पदसूची (सिलॅबल्स), धातुसूची, प्रत्ययसूची, उपसर्गसूची इ. आवश्यकतेनुसार वारंवारतादर्शक अनेक उपसूच्या व सांख्यिकी तालिका तयार करण्यात येतात. प्रकाशित झालेल्या उपरोक्त प्रबंधात मराठीबाबतचे या तऱ्हेचे बरेचसे संशोधन पार पडलेले आहे. त्याखेरीज प्रबंधाच्या उत्तरार्धात अक्षरांचे रूप, त्यांची शरीर-यष्टी (बॉडीलाईन), वळणे, गोलवे, लकेरी, काना-कोन-किनारे, बिन्दू-छेद, रेफ-रफार, नुक्ते, बाणाग्रे, इ. लेखनघटक लिपीच्या एकंदर क्षमतेवर कसा परिणाम करतात याची उदाहरणे देवनागरी, मोडी, गुजराती, उर्दू व रोमन लिपींच्या आधारे काही प्रयोगांसहित देण्यात आली आहेत. त्याच-प्रमाणे भारतीय लघुलेखकांना परिचित असलेल्या पिलपचा आणि ग्रेग व स्लोन-डुप्लोयन या अन्य पाश्चात्त्य पद्धतींचाही परामर्श घेण्यात आला आहे. उपरोक्त प्रबंध इंग्रजीत आहे. मराठी वाचकांसाठी त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे येथे थोडक्यात देण्यात येत आहेत.

**लेखनविषयक समस्यांचे मूळ**

वर्णाक्षरे, स्वर-व्यंजनांची जुळणी, अनुस्वार, संयुक्ताक्षरे, ऱ्हस्वदीर्घत्व, आघात, आरोहावरोह, इ० घटकांनी भाषेची लेखनपद्ध ती सिद्ध झालेली असते. वर्णाक्षरे हा त्यातील सर्वांत महत्त्वाचा घटक. एका वर्णाला एक अक्षर आणि एका अक्षराचा एकच वर्णोच्चार असा १ : १ समन्वय भाषेत व तिच्या लिपीत असतो तेव्हा ती लिपी लेखनक्षम ठरते. यालाच वर्णाक्षर न्याय म्हणतात. ५२ वर्ण व ५२ अक्षरे यांची चपखल सांगड बसल्याने देवनागरी ही संस्कृतची आदर्श लिपी झालेली आहे. अक्षरे तीच असली तरी मराठीची ती आदर्श लिपी नाही. मराठीचे वर्ण ३८ आणि संस्कृतकडून आलेली अक्षरे ४८ (ऋ,

ऋ, ऌ, ॡ आता गेलेले आहेत). साहजिकच वर्णाक्षरांचा समन्वय मराठीच्या लिपीत झालेला नाही. काही वर्णांना दोन दोन अक्षरे मिळाली आहेत तेथे लिपीत अक्षराधिक्य झालेले आहे आणि काही अक्षरांचे दोन दोन उच्चार होतात तेथे लिपीला अक्षरन्यूनत्व आलेले आहे. हे दोन्ही लिपीचे गंभीर दोष आहेत. आपल्या लेखनपद्धतीतील बहुतेक समस्यांचे मूळ येथे आहे.

लिपीत अक्षराधिक्य झाल्यास लेखनपद्धतीत अस्थिरता शिरते. तिचा पहिला बळी प्राथमिक शिक्षण! 'हे अक्षर काढू का ते काढू?' या प्रश्नाचे उत्तर देता देता गुरुजी व मुले अक्षरशः म्हणजे अक्षराअक्षरावर टेकीस येतात. मुले ग्रामीण भागातील असतील तर त्यांची स्थिती दयनीय होते, आदिवासी पाड्यातील असतील तर अनुकंपनीय होते. अक्षर-द्विविधतेमुळे हतबुद्ध झालेली कोवळी मुले शिक्षणक्रम अर्धवट सोडून जातात. प्राथमिक शाळेतील मुलांची गळती किमान पस्तीस टक्के होत असल्याचे वर्षानुवर्षे ऐकू येते त्याचे एक महत्त्वाचे कारण ही द्विविधता.

अक्षराधिक्याचा दुसरा बळी असतो प्रौढ जनसाक्षर. पोटासाठी दिवसभर काबाडकष्ट करून फावल्या वेळात मोठ्या मेटाकुटीने कमावलेली साक्षरता पुढे आयुष्यभर टिकवता आली तर तिची सांगता होते. त्यासाठी नवसाक्षरांकडून थोडेफार लेखनवाचन अपेक्षित असते. पण पुनः द्विविधतेचा तो प्रश्न समोर उभा राहतो; चार सहा ओळीही खरडणे कठीण वाटू लागते. अखेरीस 'स्वाक्षरी' आली, पण साक्षरता निसटली अशी बहुतेकांची स्थिती होते. प्रौढ शिक्षणावर वेचलेले सारे श्रम, वेळ नि पैसा कारणी लागत नाहीत.

लिपीतील अस्थिरता लेखनपद्धतीला कशी खिळखिळी करते याचे बाळबोध लेखनातील एक व लघुलेखनातील एक उदाहरण पाहणे बोधप्रद होईल.

मराठीला एक इ आणि एक उ यांची भाषिक गरज आहे. पण संस्कृत अक्षरमालेतून तिला मिळाले दोन ई नी दोन ऊ. संस्कृतमध्ये यातील प्रत्येक अक्षराला नेमून दिलेले ठराविक भाषिक कार्य आहे. ऱ्हस्वाचे दीर्घ किंवा दीर्घाचे ऱ्हस्व झाल्यास संस्कृत शब्दांचा अर्थ बदलतो; जसे, सलिल-सलील, सुत-सूत. म्हणजे ई-ऊंचे ऱ्हस्वदीर्घत्व संस्कृतमध्ये अर्थनिर्णायक आहे.

'अर्थाचा' अंकुश शब्दांच्या पाठीत बसतो म्हणून ऱ्हस्व-दीर्घाची चूक त्या भाषेत होतच नाही.

मराठीचा स्वभाव निराळा आहे. मराठी उच्चारणातही स्वर ऱ्हस्व-दीर्घ होतात. पण ऱ्हस्व दीर्घत्वात उलटसुलट बदल झाले तरी त्यामुळे मराठी शब्दांचा अर्थ बदलत नाही. हे बदल कोठें होतात याची अचूक अटकळ मराठी भाषिकांना असते; ते अनुमेय असतात. उदाहरणार्थ 'घर, दार, तीन, ऊस, एक, दोन' या शब्दांतील अ, आ, ई, ऊ, ए, ओ हे स्वर उच्चाराला दीर्घ आहेत. सामान्यरूपात हेच स्वर ऱ्हस्व होतात हे आपल्याला माहीत असते. जसे 'घराचा, दाराचा, तिनाचा, उसाचा, एकाचा, दोनाचा'. पण स्वर ऱ्हस्व झाल्यामुळे शब्दांच्या अर्थामध्ये कोणताही बदल झालेला नाही, होत नाही. एवढेच नव्हे तर एखाद्याने हटवादीपणाने उच्चारात मुद्दाम बदल करून म्हटले तरी शब्दांच्या अर्थावर त्याचा यत्किंचितही परिणाम होणार नाही. भाषेची वास्तू इतकी स्वयंपूर्ण आणि पक्की असते की त्यातील एखाद्या विटेलाही धक्का लावणे शक्य नसते. थोडक्यात म्हणजे मराठी स्वरांचे ऱ्हस्वदीर्घत्व संस्कृत-प्रमाणे अर्थनिर्णायक नाही.

अ, आ, ए, ओ या चार मराठी स्वरांना एकेकच अक्षर आहे; ते एकाच प्रकारे काढता येतात. कोणाच्या मनात आले तरी ते दुसऱ्या प्रकारे काढण्याची लिपीत सोय नाही. या चार स्वरांचे लेखन एकात्मतेने होते. त्यामुळे त्यांच्या लेखनात स्थैर्य आलेले आहे. इ-उ एकेकच असते तर त्यांचे लेखनातही तसेच स्थैर्य आले असते; दोन-दोन असल्यामुळे कधी हे अक्षर लिहिले जाते तर कधी ते. पण केवळ तेवढ्याने विशेष बिघडले नसते. मराठी लेखनाला अक्षराधिक्यामुळे आलेले अस्थैर्य मुळीच नवीन नाही. काही उदाहरणे—

शक्ति-शक्ती; अड्डा-अड्डा; चक्र-चक्र-चक्र
एक-अेक; ईद-अीद; ऊस-अूस; कम्प-कंप
गायी-गाई; पाऊस-पावूस विशेष-विषेश
लौकर-लवकर; गैदी-गयदी; सतरा-सत्रा-सत्रा.

ई-ऊंचे द्विविध लेखन शिकण्याला कठीण, मुद्रणाला कठीणतर आणि टंकलेखनाला कठीणतम आहे यांत शंका नाही. पण लेखनात इतरत्र पसरलेल्या अस्थैर्याप्रमाणे इ-ऊंचे 'अस्थैर्यही' आपल्या सहज पचनी पडले असते. आज त्याची शब्दा-शब्दावर जाणीव होत आहे याचे कारण अमलात आलेले प्रचलित लेखनविषयक नियम (प्रलेनि).

ज्यांना तत्समांचे म्हणजे संस्कृतचे पूर्वज्ञान नाही त्यांना 'प्रलेनी' पाळता येत नाहीत. प्रत्येक नियमाखाली अपवाद म्हणून दहावीस शब्द देण्यात आले असते तर ते पाठ करून लक्षात ठेवता आले असते. पण ई-ऊंचा समावेश असलेल्या शब्दांचे सर्व वर्ग-प्रवर्ग अपवाद समजावेत असे बंधन प्रलेनींनी व्यक्तिगत लिहिणारावर टाकल्याने मराठी जनसाक्षरांची पंचाईत झालेली आहे. भाषा श्राव्य आहे नि लेखन दृश्य आहे; कुत्रा-मांजर, गाई-घोडे यांच्यासारखे प्राणी नुसत्या आवाजावरून ओळखता येतात किंवा पाहताक्षणीच त्यांच्यामधील फरक जाणवतो. तसे शब्दांच्या बाबतीत होत नाही. शब्द उच्चारताक्षणी किंवा लेखनात पाहताक्षणी, त्याचे पूर्वज्ञान असल्याशिवाय, अमुक तत्सम व अमुक मराठी असा भेदभाव करणे जमत नाही तेव्हा नियमभंगाचा शिक्का बसतो. तत्त्वत: संस्कृतचे नियम मराठीला लावणे गैर आहे. त्यामुळे याला नियमभंग म्हणता येणार नाही.

आपल्या वापरात असलेले सर्व शब्द मराठी अशी सरळ भावना मराठी जनसामान्यांची असते, आणि याबाबतीत हीच तर्कशुद्ध भूमिका आहे. एका बाजूने तत्समांची ओळख नाही आणि दुसऱ्या बाजूने प्रलेनी अमलात तर आलेले आहेत. अशा विचित्र कैचीत सापडलेला मराठी जन-साक्षर समोर येणारा शब्द एकदा मराठी आणि एकदा तत्सम समजून लिहू लागला तर आश्चर्य वाटू नये. तो त्याचा दोष समजता येणार नाही. ते उत्तरदायित्व प्रलेनींचे आहे. परिणामी, मराठी लेखनात एकेका शब्दाची रूपे गणितश्रेणीने वाढत आहेत. उदा०

करान्ति-क्रान्ति-क्रान्ति ; कांति-क्रांति-क्रांति
करान्ती-क्रान्ती-क्रान्ती ; कांती-क्रांती-क्रांती

तण्टा - तंटा ; आम्बा- आंबा ; दङ्गा- दंगा
क्लुप्ति - क्लृप्ति; क्रुपा - कृपा; मिश्रा-मिष्रा

लिपी हे भाषेचे आवश्यक अंग नाही. भारतात अद्याप लिपिबद्ध न झालेल्या शेकडो भाषा आहेत. भाषा उच्चारमयी आहे; एका शब्दाचा एकच उच्चार होतो पण लेखनात त्याची कितीही रूपे खपून जातात. वर 'क्रान्तीची' १२ रूपे दिसत आहेत. उच्चाराला धक्का पोचत नाही तोपर्यंत भाषेला ही सर्व रूपे मान्य आहेत; आणखीही चालतील ! याच कारणामुळे भाषेला कोणतीही लिपी चालू शकते, चालली पाहिजे. अमुक भाषा अमुक लिपीतच लिहिता येणे शक्य आहे अशी काहींची असलेली समजूत केवळ अंधश्रद्धापूर्ण नाही तर तर्कदुष्ट आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रोमन ही राज्य-लिपी म्हणून स्वीकारलेल्या एका भारतीय घटक राज्याचा कारभार उत्तम चालला आहे हे कितिकांना ठाऊक आहे ?

लेखनात शिरलेली अस्थिरता भाषेला तशी बाधक होत नसली तरी ती समाजाची कशी अपरिमित हानी करीत असते हे प्राथमिक व प्रौढ शिक्षणाच्या संदर्भात आपण पाहिले. इतर अनेक क्षेत्रांत होणारा तिचा चोरटा प्रवेश असाच हानिकारक असतो. आपल्या घटनेने देवनागरीचा राष्ट्रलिपी म्हणून स्वीकार केलेला आहे. आपण तिला बाळबोध म्हणतो. तिची अक्षरमाला वर्णाक्षर न्यायाप्रमाणे बेतून घेऊन तिच्यात आज असलेली लेखन-अस्थिरता संपविणे सामाजिक हिताचे आहे. पश्चिम युरोपमधील स्पॅनिश, पोर्तुगीज, इटालियन, फिनिश इ० ज्या भाषांनी आपली लिपी अशा तऱ्हेने बेतून घेतली त्यांचा अनुभव हेच सांगतो. तसे केल्यास लेखनविषयक नियमांची कदाचित गरजही भासणार नाही. त्या दिशेने पहिले पाऊल तरी पडले पाहिजे !

### एक पुरातन महदाश्चर्य

सुमारे तीन हजार वर्षापूर्वी संस्कृत लिपिबद्ध झालेली नव्हती तेव्हा साऱ्या भारतीय वेदविद्या मौखिक परंपरेने शिकत, शिकवत आणि संशोधित करीत असत. संस्कृतचे वर्ण कोणते आणि त्यांचे मुखयंत्रणेतील औच्चारिक


कार्य कसे चालते हे वर्णन करणारी ' वर्णविद्या ' त्यांतील एक होती. तयार असलेल्या वर्णांसाठी अक्षराकृतींच्या संशोधनात असताना ख्रि. पू. ६/५ व्या शतकात भारतीयांचा संपर्क पश्चिमेकडील आरेमिअन लिपीशी आला. तिच्या अक्षराकृती सोयीच्या नव्हत्या, पण त्यांच्यावरून सुचलेल्या संकल्पना घेऊन संस्कृतच्या वर्णांना अनुकूल अशी अक्षरे बनवून त्या काळी तयार करण्यात आली ती ब्राह्मी लिपी. मध्यंतरीच्या अडीच हजार वर्षांत उत्क्रांत होत होत आज आपल्यासमोर उभी आहे ती देखणी देवनागरी. आजच्यासारखी भौतिक साधने वा सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध नसताना त्या काळी भारतीयांनी संस्कृतची वर्णाक्षरे अचूक बसवून घेण्याचे कार्य साधले हे भाषाशास्त्राच्या इतिहासातील एक महदाश्चर्य गणले गेले आहे !

मराठीने आपले लेखन हजार वर्षांपूर्वी देवनागरीत सुरू केले तेव्हा तिची वर्णमाला माहीत नव्हती. दुसऱ्या महायुद्धानंतर आधुनिक भाषाशास्त्राचा अभ्यास भारतात सुरू झाल्यावर आता ती तयार आहे. अद्याप ती अधिकृतरीत्या प्रसिद्ध झालेली नाही. तशी ती होईल तेव्हा वर मराठी वर्णांची संख्या ३८ सांगितली आहे, तीत कदाचित एखाद्या वर्णाचा फरक पडेल.

## पिलपचे अक्षरवैपुल्य


बाळबोधमध्ये अक्षराधिक्य आहे तर पिलपमध्ये अक्षरवैपुल्य आहे !

वर्णाला दोन दोन अक्षरे झाल्याने बाळबोध लेखनात निर्माण झालेली अस्थिरता पाहिल्यानंतर वर्णागणिक तीन-तीन, पाच-पाच अक्षरे असलेल्या पिलपमध्ये काय स्थिती असावी याची सहज कल्पना करता येते. उदाहरणे * :–



र :  राब  आरोप  दीर्घ

 कर्ण  मामलेदार

* उदाहरणे ' मराठी लघुलेखन ', भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई (द्वितीयावृत्ती) यामधून घेतलेली आहेत.

ल :  लोप  अलग  कुशल

ळ :  पळ  नळ  भळभळ

ह :  हबका  हाकाटी  होळी

 लिहिणे  काहीही

चक्रात पुनः छोटी चक्रे असावीत त्याप्रमाणे वरील सोळा शब्दांच्या अनेकाक्षरी युक्तीमध्ये अनेक प्रयुक्त्या आहेत. उदा० एकाच शब्दात लेखन-दाब बदलून काही अक्षरे ठळक आणि काही पुसट काढण्यात आली आहेत; पिलपचे खास वैशिष्टच समजले जाते त्या 'स्थितिलेखना'प्रमाणे काही शब्द रेषेपासून दूर, काही रेषेवर आणि काही रेषेमधून काढलेले दिसत आहेत; 'रकण, रदिघ, कुलश, ळभळभ' असे विपर्यस्त लेखन करून ते 'कर्ण, दीर्घ, कुशल, भळभळ' असे सरळ वाचावयाचे आहेत. नवशिकाऊंकडून तारेवरील अशी कसरत करून घेणाऱ्या काही पिटमनी आक्षरिक क्लृप्त्या वर दिसत आहेत.

### भाषिक वैशिष्ट्ये व पिलप

इंग्रजी भाषेसाठी पिलप पर्याप्त आहे तशी ती भारतीय भाषांसाठी का होऊ शकत नाही हे दर्शविणारी दोन भाषेतील शब्दांची एक छोटीशी तुलना :

(अ) मराठी शब्द

घर : घरे, घराला, घरांना, घरांचा, घरासाठी, घरापासून इ०

हसणे : हसतो, हसते, हसतात, हसला, हसले, हसल्या, हसतील इ०

(A) इंग्रजी शब्द

house : houses, to a house, from the house etc.
to sing : sing, sings, sang, will sing, shall sing etc.

इंग्रजी शब्द कोशातून भाषेत आल्यावर त्यात फार क्वचित बदल होतो. मराठी शब्दांमध्ये मात्र बदल साधारणपणे होतोच. मराठीच्या अंत्य व उपांत्य स्वरातील बदल हा शब्दांच्या लिंग-वचन-पुरुष इ० भेदांचा नियंत्रक असतो. हे नियंत्रक स्वर बाळबोध लेखनात व्यंजनांना जुळलेले असतात; पिलप-मध्ये ते सुटे असतात. स्वर-जुळणीच्या या दोन पद्धतींचा लेखनावर, विशेषत: गतिलेखनावर, काय परिणाम होतो हे दर्शवणारे एक उदाहरण :

आई गेली आणि तिच्याबरोबर मुले गेली.

ते गेले आणि त्यांच्याबरोबर मीही गेले.

सहा सहा शब्दांची ही दोन छोटी छोटी वाक्ये आहेत. प्रचलित नियमां-नुसार दोन्ही वाक्यांत शेवटच्या क्रियापदांवर लिंग-वचन-दर्शक शीर्षबिंदू दिलेला नाही. पूर्वी तो देत असत; तेथे तो स्वरांचे अपुरे राहिलेले भाषिक कार्य पुरे करीत असे. आता एवढ्याशा छोट्या वाक्यातसुद्धा 'आई, मुले, ते, मी' हे शब्द जर लेखनात गळाले (आणि लघुलेखनात शब्द गळतात तेथे टिंबांची काय कथा?) तर या वाक्यांतील 'कर्ता' कोण हे बाळबोधमध्ये-सुद्धा क्षणभर कळणार नाही; त्यासाठी संदर्भातील मागील-पुढील वाक्ये किंवा सर्व परिच्छेद काळजीपूर्वक धुंडाळावा लागेल. शीर्षबिंदू नसल्याने बाळबोध लेखनात जर अशी गडबड होऊ शकते, तर सुटे स्वर गळाल्याने लघुलेखनात काय तारांबळ उडत असेल याची कल्पनाच करावी !

## पिलपमधील शब्दचिन्हे व वाक्यांश

शब्दचिन्हे (लोगोग्राम्स) आणि वाक्यांश (फ्रेझिऑलॉजी) यांचाही पिलपमध्ये भरपूर वापर करण्यात येतो. शब्दचिन्हे उच्चाराशी संबंधित असतातच असे नाही आणि वाक्यांश त्यातील केवळ एक-दोन वर्णांच्या आधारे दाखविले जातात. त्यामुळे शब्दचिन्हे व वाक्यांश प्रथम कारिकांसारखे पाठ करून लेखनात घोटावे लागतात आणि शेवटी ते अचूक टंकलिखित करावे लागतात. म्हणजे वस्तुत: जो 'भार' लघुलेखनाने पेलला पाहिजे तो 'स्मृतीला' आणि भाषाप्रभुत्वाला पेलावा लागतो. एरवी टंकलेखनात

मोकळ्या राहणाऱ्या जागा भरता येत नाहीत ! आजही पुणे-मुंबई-नागपूर सारख्या मराठीच्या माजघरात इंग्रजी लघुलेखकांपैकी बहुसंख्य लेखक जेथे इंग्रजी पक्के पाय रोवून आहे त्या दक्षिणेकडील राज्यांतून येतात याचे कारण त्यांचे भाषेवरील प्रभुत्व !

शब्द-चिन्हे-वाक्यांश यांचे शिकण्यातील काठिण्य महाराष्ट्रात मराठी लघुलेखनाबाबत येऊ नये असे कोणालाही प्रथमदर्शनी वाटेल. पण ते पिलपच्या मागील दाराने कसे घुसले आहे याची एक तुलनात्मक झलक :

एक 'विपर्यस्त'-पणे लिहिलेले शब्दचिन्ह जाड-बारीक करून, लांबीला निम्मे करून, स्थितिलेखन करून इंग्रजी-मराठीतून वापरण्यात आले आहे; त्यातून विविध 'अर्थप्रवाहातील' शब्द कसकसे बाहेर पडतात हे पाहणे बोधप्रद आहे :—

इंग्रजी[1]


| क्र. | शब्दचिन्ह | तयार झालेले शब्द | अर्थभेद | शब्दसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 |  | call | पहिला | १ |
| 2 |  | called | " | १ |
| 3 |  | equal, equally | दुसरा | २ |
| 4 |  | equalled | " | १ |
| 5 |  | cold | तिसरा | १ |
| 6 |  | gold | चौथा | १ |
| | | | | ७ |

[1]Pitman Shorthand Instructor and Key, Second Indian Edition, 1975, A. H. Wheeler & Co (P) Ltd, Allahabad. Page 291

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
51234/9
ग्रंथालय.

## सतरा

### मराठी[2]

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ |  | केला, केली, केले, केल्या | पहिला | ४ |
| | | देखील | दुसरा | १ |
| २ |  | काल, काळ | तिसरा | २ |
| | | खाली | चौथा | १ |
| ३ |  | कोठला-ली-ले-ल्या | पाचवा | ४ |
| | | कडील | सहावा | १ |
| ४ |  | गेला-ली-ले-लो-ल्या | सातवा | ५ |
| | | वेगळा-ळी-ळे-ळ्या | आठवा | ४ |
| ५ |  | लागला-ली-ले-लो-ल्या | नववा | ५ |
| | | | | २७ |

ज्या शब्दचिन्हापासून इंग्रजीत ४ अर्थप्रवाहातील ७ शब्द तयार होतात, त्याच चिन्हापासून मराठीत ९ अर्थप्रवाहातील २७ शब्द तयार होतात. काठिण्याचे अधिक विश्लेषण नलगे !

[2]उपरोक्त 'मराठी लघुलेखन', पृष्ठे २११-१५

## लघुलेखन महर्षी

उच्चारानुसारी लघुलेखनपद्धतीचा प्रारंभ सर आयझॅक पिटमन यांच्या १८३७ साली इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रणालीने झाला. मध्यंतरीच्या दीडशे वर्षांत ज्ञान-विज्ञानाच्या एकंदर प्रगतीबरोबर लिपिशास्त्र व कला यांचीही बरीच प्रगती झाली. त्या काळी पिलपमध्ये वापरलेल्या अनेक लेखनक्लृप्त्या आज कालबाह्य वाटल्या तरी पिलपने घालून दिलेल्या पायावरच पुढील संशोधनाची बांधणी चालू आहे. हे लक्षात घेता सर आयझॅक पिटमन हे लघुलेखन महर्षी होते यात शंका नाही. त्या काळी वापरलेल्या युक्त्या-प्रयुक्त्यांमुळे पिलप शिकण्याला कितीही कठीण वाटली, तरी एकदा शिकून झाल्यावर इंग्रजीच्या गतिलेखनासाठी आजही ती एक समर्थ लिपी आहे.

## प्रस्तुत संशोधनाचा उद्देश

तयार होणारी लघुलेखनपद्धती शिकण्याला सोपी, लिहिण्याला जलद आणि वाचनाला अचूक व्हावी हा संशोधनाचा उद्देश होता. तो साधण्यासाठी आपल्याकडे या क्षेत्रात येथवर चालत आलेल्या काही संकल्पनांत मूलभूत बदल करण्यात आले आहेत. पहिला बदल : निम्न गुणवत्ता व वेतनश्रेणी असलेले ते शीघ्रलेखक (स्टेनोटायपिस्टस्) आणि उच्च गुणवत्ता व वेतनश्रेणी असलेले ते लघुलेखक (स्टेनोग्राफर्स) हा फरक आपल्या परिचयाचा आहे. आज या दोघांनाही एकच अभ्यासक्रम पुरा करावा लागतो. लघुलेखन ही कला आहे. इतर कलाक्षेत्रांत साधारणपणे निम्नस्तरीयांना प्राथमिक स्वरूपाचा आणि उच्चस्तरीयांना प्रगत स्वरूपाचा अभ्यासक्रम असतो. तशी विभागणी प्रस्तुत संशोधनाद्वारे आता लघुलेखनात करण्यात आली आहे. आज प्रसिद्ध होत असलेली 'शीघ्रनागरी' हा केवळ लिपीची मांडणी असणारा प्राथमिक स्वरूपाचा अभ्यासक्रम आहे. ती पूर्ण लिपी आहे. तीत कोणतीही काटछाट नाही किंवा शिकण्याला कठीण वाटतील अशा लेखनक्लृप्त्या नाहीत. शीघ्रलेखक व लघुलेखक या दोघांनाही समान असणारा हा अभ्यासक्रम आहे. ज्या शीघ्रलेखकांना नंतर लघुलेखक होण्याची ईर्षा आहे त्यांचेसाठी प्रगत अभ्यासक्रम तयार होत आहे. तो सुमारे दोन वर्षांत प्रसिद्ध होईल.

पारंपरिक संकल्पनेतील दुसरा बदल नव्या लिपीच्या अक्षरांबाबतचा आहे. मुद्रण, टंकलेखन, लघुलेखन हे एकेका भाषिक समूहाच्या रोजच्या वापरातील मूळ लेखनपद्धतीचेच तीन आविष्कार आहेत. त्यातील मुद्रण व टंकलेखन मूळ लेखनपद्धतीशी सुसंवादी असावेच लागतात; तसेच लघुलेखनही सुसंवादी ठेवल्यास ते शिकण्यास सोपे होईल असे तिकडील लिपि-सुधारणेचे अध्वर्यू जॉर्ज बर्नार्ड शॉ (१८५७–१९५०) यांचे आग्रही मत होते.

बर्नार्ड शॉ यांची संकल्पना मराठीबाबत नव्या लिपीत कार्यान्वित करण्यात आली आहे. शीघ्रनागरीची मुळाक्षरे अकरा. ती नागरी अक्षरां-पासून कशी घेतलेली आहेत हे त्यांच्या परिचयचित्रांवरून लक्षात येईल. (पृ. ४–५). मराठीच्या वर्णमालेवर आधारित असलेली पूर्ण अक्षरमाला या मूळ अकरांपासून साधलेली आहे. स्वर-जुळणी, अनुस्वार, संयुक्ताक्षरे इत्यादींचा सुसंवाद बाळबोध लेखनाशी साधल्याने येथवर लघुलेखनात जे 'लेखन-प्रकार' काढता येत नसत ते आता काढता येतात. उदाहरणार्थ कै. न. चिं. केळकर, अ. र. अंतुले, ज्ञा. धों. झांब्रे, ए. उ. मेश्राम. दौ. मु. साटम, अशी नावे पूर्वी मराठी पद्धतीने लिहिता येत नसत, काव्यपंक्ती वा संस्कृत अवतरणे देता येत नसत, किंवा बीजगणित–पदार्थविज्ञानासारख्या विषयात येणाऱ्या अक्षरमय खाणाखुणा काढता येत नसत त्या सर्व आता नव्या लिपीत जशास तशा काढता येतात.

**शीघ्रनागरी नाव का ठेवले ?**

मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांतून ज्यांना रोज काही ना काही लेखन करावे लागते अशांचा एक अनुभव नेहमी ऐकायला मिळतो. ठराविक लांबीचा मराठी मजकूर लिहिण्याला जेवढा वेळ लागतो त्याच्या निम्या वेळात तेवढाच इंग्रजी मजकूर सहज लिहून होतो असा तो अनुभव असतो. दोन लिपींच्या लेखनक्षमतेतील फरक हे त्याचे कारण आहे. लिपींच्या घडणीतील मूलभूत फरकामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत असा फरक पडतो. एका शब्दात सांगावयाचे झाल्यास देवनागरी कोनमयी आहे, तर इंग्रजीची धावती लिपी गोलसर आहे. गोलसर वस्तू कुठेही पडली तरी थोडीफार घरंगळते, तीच कोनमयी वस्तू मुद्दाम हलविल्याशिवाय जागची हलत नाही.

लिपीबाबत तर हे अधिकच खरे आहे. नागरीत लेखणी कोनाकोनावर उचलून पुन्हा टेकवावी लागते. हीच स्थिती कमी प्रमाणात पिलपची आहे. धावत्या लिपीत शब्द लेखणीच्या एका ओघात काढता येतात; त्यामुळे क्षणभर वेळ नि कणभर श्रम अक्षरागणिक वाचतात आणि एकंदर लेखनावर त्याचा परिणाम होतो.

आधुनिक युगात लिपीचे मूल्य अक्षरसौंदर्यावरून नव्हे तर तिच्या गतिमानतेवरून ठरते, एरवी इतर सर्व बाबतीत गुणवती असलेली नागरी या बाबतीत कमी पडते. नागरीचे हे वैगुण्य भरून काढून नवी लिपी गतिमानतेत तिला पूरक ठरावी असा संशोधनाचा हेतू होता.

बाळबोध (नागरी) लेखन साधारणपणे दर मिनिटाला २० शब्द या गतीने होते. वैयक्तिक चापल्यामुळे त्यात चार दोन शब्दांचा कमी जास्त फरक पडतो. शीघ्रनागरी अक्षरांची शरीरयष्टी (बॉडीलाइन) नागरीच्या पावपटीपेक्षाही कमी आहे व ती एकमेकांना जोडलेली असतात, या एकाच गोष्टीमुळे तिची लेखनगती द. मि. किमान ८० शब्दांची झालेली आहे.

जी देवनागरीपासून जन्मली, जिच्यात नागरीची सर्व वैशिष्ट्ये आहेत, आणि गतिमानतेत जी नागरीला पूरक ठरते तिचे नाव यथार्थतेने शीघ्रनागरी असे ठेवण्यात आले आहे.

**लिपी शिकण्यास लागणारा काळ**

शीघ्रनागरीची विभागणी वीस पाठांत केलेली आहे. एका तासात एक पाठ सुलभतेने शिकता व शिकवता येतो. याची प्रचीती पदवीवर्गातील काही विद्यार्थ्यांना लिपी प्रत्यक्ष शिकवून घेण्यात आली आहे. प्रौढांना शिक्षकाच्या मदतीशिवाय शिकता यावी अशी तिची रचना आहे. अक्षरे रेखाटणे ही कला आहे. अक्षरओळख चटकन झाली तरी ती लेखणीतून यथायोग्य व त्वरेने उतरण्यास बराच सराव करावा लागतो. गवयाला रियाझ तसा शीघ्रलेखकाला सतत अक्षरसराव हा यशाचा एकच मार्ग आहे. दररोज दोन तासांचा सराव धरून तीन दिवसांनी एक पाठ याप्रमाणे दोन महिन्यांत लिपी उत्तम रीतीने शिकून पुरी होते. नंतर द. मि. ८० ची शब्दगती

येण्यास त्याच दराने आणखी चार महिने लागतात. यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे दोन तासांचा दैनंदिन सराव ही आहे.

* * *

गेल्या वर्षी काही काळ भारतात असताना गुरुवर्य डॉ. सुमित्र मंगेश कत्रे यांनी नागपुरास येऊन पुस्तकाच्या हस्तलिखिताचे अवलोकन केले. त्यांचा पुरस्कार (फोरवर्ड) म्हणजे 'शीघ्रनागरीला' साक्षात् आशिर्वादच!

नागपूर विद्यापीठातील भाषाशास्त्र विभागप्रमुख डॉ. सु. बा. कुलकर्णी आणि मराठी विभाग प्रमुख डॉ वि. बा. प्रभुदेसाई; तुमसरचे प्राध्यापक अविनाश खंडकर व पुण्याचे श्री. शंकर थत्ते यांचे प्रस्तुत संशोधनात वेळोवेळी साह्य मिळाले. संशोधक त्यांचा ऋणी आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार करणारे नागपूरचे चित्रकार श्री. वि. वि. पांढरकर, अक्षरांची परिचयचित्रे काढून देणारे पुण्याचे श्री. मोहन थत्ते यांना धन्यवाद.

पुण्याच्या लोकसंग्रह कारखान्याचे व्यवस्थापक श्री. का. गं. सोनार व त्यांचे सहकारी यांनी पुस्तकाचे मुद्रण सोशिकतेने पार पाडले; त्यांना हार्दिक धन्यवाद.

चालू शतकातील मराठीच्या लिपीचे महान द्रष्टे स्वातंत्र्यवीर सावरकर यांना त्यांच्या जन्मशताब्दि वर्षी अभिवादन करून हे प्रास्ताविक संपवितो.

**नागपूर,**
**१ मे १९८४**

श्री. धो. भागवत

# शीघ्रनागरी लिपी

## सुरवातीचे थोडेसे

### १. लेखन साहित्य :

शीघ्रनागरी लिपीत रेषेला भेदून, रेषेवर आणि रेषेपासून दूरकस असे स्थितिलेखनाचे भेद नांहीत. त्यामुळे देवनागरीप्रमाणे ही लिपीसुद्धा कोऱ्या कागदावर लिहिता येते. पण लेखणीत शिस्त बाणण्यासाठी, लघुलेखनासाठी आखलेल्या लांबट वह्या मिळतात त्या सुरवातीला काही काळ वापराव्यात म्हणजे अक्षरा-अक्षरातील प्रमाणबद्धता आणि लिखित मजकुराची एकंदर सरलता साधत जाते.

### २. देवनागरीची शिरोरेखा :

देवनागरीला शिरोरेखा असते आणि त्या अनुरोधाने लिपी पुढे पुढे सरकत असते. आता सर्व जीवनच धावपळीचे व घाईगर्दीचे झाले आहे; त्याला लेखनही अपवाद राहिलेले नाही. क्षणभर वेळेची नी कणभर श्रमाची बचत व्हावी म्हणून आपल्या लेखनातून शिरोरेखा गळण्याचे प्रमाण अभावितपणे वाढत आहे; पण लिहिणाऱ्याच्या डोळ्यासमोर जी एक काल्पनिक शिरोरेखा सदैव वावरत असते त्या अनुषंगानेच कोऱ्या कागदावरसुद्धा आपले लेखन एका रेषेत चालू असते.

### ३. शीघ्रनागरीची आधाररेषा :

प्रस्तुत लिपीत वहीतील रेषा ही आधाररेषा म्हणून कल्पिलेली आहे. त्या रेषेच्या अनुरोधाने लिपी बसलेली आहे. एकदा लिपी अंगवळणी पडली की ही काल्पनिक आधाररेषा सरळ लिहिण्याचे आपले काम नकळत करीत असते. मग आखलेल्या ओळींचा आधार घ्यावा लागत नाही, आणि नागरीप्रमाणे नव्या लिपीतही कोऱ्या कागदावर लेखन करता येते.

### ४ बॉलपेनचा वापर :

चेक लिहिण्यासाठी वापरतात तसे बॉलपेन शीघ्रनागरीसाठी वापरावे, ते पेन्सिलीपेक्षा अधिक स्पष्ट उमटते, निर्दोष लिहिते, दीर्घकाळ चालते व मुख्य म्हणजे प्रत्येकाला आपल्या नैसर्गिक दाबाने व कलाने सुरवातीपासून शेवटपर्यंत सारखे लिहिता येते.

# पाठ पहिला

## मूळ शीघ्राक्षरे

### १. शीघ्राक्षरे

शीघ्रनागरीत व्यंजनवर्ण तेवढे अक्षररूपाने येतात. स्वर बारीक बारीक चिन्हरूपाने येतात व व्यंजनांशी आपल्या बाराखडीप्रमाणे जुळणी करतात. म्हणून व्यंजनाक्षरांची ओळख प्रथम होत आहे; त्यांना शीघ्राक्षरे म्हणतात.

### २. शीघ्राक्षरांची दोन रूपे

शीघ्राक्षरांच्या रूपाचे प्रकार दोन. चंद्रकोरीसारख्या गोलसर असतात त्या कोरी किंवा कोराक्षरे आणि सरळ रेषा असतात त्या रेखा किंवा रेखाक्षरे.

### ३. लेखनदिशा

जी शीघ्राक्षरे आपल्या डावीकडून उजवीकडे जातात ती अग्रगामीं, वरुन खाली येतात ती अधोगामी आणि खालून वर जातात ती ऊर्ध्वगामी.

### ४. आडवी व उभी शीघ्राक्षरे

वहीतील रेषांना समान्तर असणाऱ्या अग्रगामींना आडवी आणि अधोगामी व ऊर्ध्वगामींना उभी शीघ्राक्षरे म्हणतात.

### ५. शीघ्राक्षरांच्या दोन बाजू

आडव्या शीघ्राक्षरांना वरची व खालची बाजू असते तर उभ्या शीघ्राक्षरांना डावी व उजवी बाजू असते.

## ६. शीघ्राक्षरावरील कल्पित चिन्हस्थाने

सामान्य लांबीच्यां शीघ्राक्षरावर तीन स्थाने कल्पिण्यात आली आहेत. अक्षर सुरू होते ते आद्य स्थान, संपते ते अंत्यस्थान आणि या दोहोंच्या मधोमध असते ते त्यांचे मध्यस्थान. ठेंगू अक्षरावर केवळ मध्यस्थान असते.

## ७. अंगचिन्हे व पार्श्वचिन्हे

जेव्हा शीघ्राक्षराच्या अंगावर परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या स्थानी लेखनचिन्ह काढतात तेव्हा त्या चिन्हाला अंगचिन्ह म्हणतात. जेव्हा लेखनचिन्ह अंगावर न पडता शीघ्राक्षराच्या या किंवा त्या बाजूस चिन्हस्थानाच्या अगदी जवळ पडते तेव्हा त्याला पार्श्वचिन्ह म्हणतात.

## ८. नागरी अक्षरापासून शीघ्राक्षरे

मूळ शीघ्राक्षरे ११ आहेत. त्यांची उत्पत्ती नागरी अक्षरांपासून झाली असून त्यांची सरासरी शरीरयष्टी (बॉडीलाईन) नागरी अक्षरांपेक्षा पावपटीनेही कमी आहे हे त्यांच्या पुढील परिचयचित्रांवरून दिसून येईल.

## ९. शीघ्राक्षरांची परिचयचित्रे


मूळ अकरा शीघ्राक्षरांपैकी पहिली सात प्रत्येकी पाव इंच लांबीची आहेत; त्यांना सामान्य लांबीची शीघ्राक्षरे म्हणतात. उरलेली चार १/८″ लांबीची आहेत; त्यांना ठेंगू शीघ्राक्षरे म्हणतात. पुढील परिचयचित्रातील ठळक भाग म्हणजे त्यापासून निर्माण झालेले शीघ्राक्षर :—

### (अ) सामान्य लांबीची मुळाक्षरे (७) :–


| परिचयचित्र | शीघ्राक्षर | उच्चार | रुपवर्णन व लेखनदिशा |
|---|---|---|---|
|  |  | क | अग्रगामी कोर; वरील बाजूस फुगीर. |



**च** अधोगामी रेखा; आधाररेषेशी ६०° चा कोन.




**ट** ऊर्ध्वगामी कोर; डावीकडे फुगीर उजवा कल.



**त** ऊर्ध्वगामी रेखा; आधाररेषेशी ३०° चा कोन.



**प** अधोगामी कोर; डावीकडे फुगीर डावा कल.



**न** अग्रगामी रेखा.



**र** अग्रगामी कोर; खाली फुगीर.


**(आ) ठेंगू मुळाक्षरे (४) :—**




**ल** अधोगामी कोर; डावीकडे फुगीर. उजवा कल.



**व** अधोगामी कोर; उजवीकडे फुगीर. उजवा कल.



**स** अधोगामी कोर; उजवीकडे फुगीर. डावा कल.



**ह** उर्ध्वगामी कोर; उजवीकडे फुगीर. उजवा कल.

## १०. शीघ्राक्षरांचा सराव

सुटया अक्षरांचा सराव करताना प्रत्येक वेळी स्वतःशी उच्चार करीत जावा म्हणजे अक्षरप्रतिमा मनात लवकर ठसत जातात. एकाच बैठकीत दोन तास सराव करण्याऐवजी तेवढाच वेळ दिवसातून दोन-तीनदा विभागून दिल्यास तो अधिक फलदायी ठरतो. सराव करताना पुढील सूचना ध्यानात ठेवाव्यात.

१. आडवी शीघ्राक्षरे (क, न, र) दोन ओळींच्या मधोमध काढावीत.

२. ऊर्ध्वगामी शीघ्राक्षरे (ट, त, ह) आधाररेषेपासून किंचित दूर काढावीत.

३. अधोगामी शीघ्राक्षरे (च, प, ल, व, स) आधाररेषेवर टेकतील अशा बेताने काढावीत.

## गृहपाठ पहिला

खालील (अ) व (आ) मधील सुटी अक्षरे, परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे, पाच वेळा शीघ्रनागरीत लिहा :–

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | क | च | ट | त | प | न | र | ल | व | स | ह |
| | च | ट | त | प | न | र | ल | व | स | ह | क |
| | ट | त | प | न | र | ल | व | स | ह | क | च |
| | त | प | न | र | ल | व | ल | ह | क | च | ट |
| | प | न | र | ल | व | स | ह | क | च | ट | त |
| (आ) | न | र | ल | व | स | ह | क | च | ट | त | प |
| | र | ल | व | स | ह | क | च | ट | त | प | न |
| | ल | व | स | ह | क | च | ट | त | प | न | र |
| | व | स | ह | क | च | ट | त | प | न | र | ल |
| | स | ह | क | च | ट | त | प | न | र | ल | व |
| | ह | क | च | ट | त | प | न | र | ल | व | स |

# साधित शीघ्राक्षरे


## १. पार्श्वटिंबाने साधलेली पंचवर्गीय शीघ्राक्षरे (१५)

पंचवर्गीय मूळ शीघ्राक्षरापैकी 'क'ला खालच्या बाजूस व इतर चौघांना उजव्या बाजूस आद्य, मध्य व अन्त्य स्थानी पार्श्वटिंब दिल्याने त्या त्या वर्गातील इतर तीन शीघ्राक्षरे अनुक्रमाने तयार होतात :–




## २. लांबी निम्मी करून साधलेली ठेंगू शीघ्राक्षरे (५)

न, ट, च, र ही सामान्य लांबीची शीघ्राक्षरे लांबीला निम्मी म्हणजे ठेंगू केली की, पुढील पाच शीघ्राक्षरे सिद्ध होतात :–



३. लांबी दीडपट करून साधलेले शीघ्राक्षर (१)


अग्रगामी —— न    शीघ्राक्षरापासून दिढी (·४") ——— ण

४. शीघ्राक्षरांची उच्चारानुसारी जुळणी

देवनागरीत शब्दातील अक्षरे एकमेकांस जुळलेली नसतात. शीघ्रनागरीत ती जुळलेली असतात. शब्दातील वर्ण ज्या क्रमाने उच्चारले जातात त्याच क्रमाने त्यांची शीघ्राक्षरे एकमेकास जोडली जातात.


५. शब्दलेखनाचे नियम

**नियम पहिला :** शब्दातील सर्व शीघ्राक्षरे आडवी असतील तर शब्दाकृती दोन ओळींच्या मधोमध काढावी. जसे,



कर नळ रम कण

**नियम दुसरा :** शब्दातील सर्व शीघ्राक्षरे उभी असतील, अथवा उभी-आडवी अशी सरमिसळ असतील तर शब्दाकृतीतील पहिले उभे अक्षर रेषेवर टेकेल अशा बेताने काढावे :




बभ जतन वलय सहज
तबक गडद सहन सरळ
शपथ कमल मडक सकल

**नियम तिसरा :** दोन शब्दांत पाव इंच अंतर असावे.

६. विरामचिन्हे

देवनागरीतील विरामचिन्हे शीघ्रनागरीत वापरली जातात. पुढील चार चिन्हात किंचित फरक आहे; इतर सर्व चिन्हे जशासतशी नागरी-प्रमाणे :–



पूर्णविराम x प्रश्नचिन्ह उद्गारचिन्ह कंस

७. लेखनवाचनाची आवर्तने

कोणत्याही लेखनाचा उद्देश नंतर त्या लिखित मजकुराचे अचूक वाचन करणे हा असतो. तो उद्देश साधावयाचा तर आपण शीघ्रनागरीत जे लिहितो ते प्रत्येक वेळी आपणास वाचता आले पाहिजे. उदाहरण म्हणून पुढील गृहपाठातील परिच्छेद (अ) (i) घ्यावा. हा परिच्छेद ग–पासून ड–पर्यंत पूर्ण लिहावा नंतर लगेच तो वाचण्याचा प्रयत्न करावा. असे करताना, आवश्यकता वाटल्यास, आपले लेखन नागरी लेखनाबरोबर ताडून पहावे. काही चुका आढळल्यास त्या दुरुस्त कराव्यात. येथे सरावाचे एक आवर्तन संपते. अशा पद्धतीने गृहपाठात नेमून दिलेली आवर्तने पुरी करावीत. नंतर पुढील परिच्छेदाकडे वळावे.

## गृहपाठ दुसरा


(अ) (i) पुढील अक्षरे शीघ्रनागरीत पाच वेळा लिहा :–

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | ज | ड | द | ब | म | य | ण |
| ज | ड | द | ब | म | य | ण | ग |
| ड | द | ब | म | य | ण | ग | ज |
| ख | छ | ठ | थ | फ | श | ळ | ष |
| घ | झ | ढ | ध | भ | म | य | श |
| क | ग | प | भ | त | ध | ट | ड |

(अ) (ii) पुढील अक्षरजोडया पाच वेळा शीघ्रनागरीत लिहा :–

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गट | घट | गड | जप | नभ | यश | लज | नय |
| कम | सम | वम | रम | जम | धम | हम | मट |
| वय | गय | लय | दय | पय | सय | रय | रह |
| कश | सश | पश | नश | वल | लव | पस | सप |

(आ) पुढील शीघ्रनागरी शब्द प्रथम वाचा; नंतर त्यांची शीघ्र-नागरीत पाच आवर्तने करा :-



[* या शब्दांत 'सुलभुक' आहे. पाठ ११, परि. ३ पहा.]

## पाठ तिसरा


# स्वर 'आ'

**१, स्वरलेखन**

शीघ्रनागरीमध्ये छोटी छोटी वृत्ते आणि अर्धवृत्ते यांनी स्वर दाखविले जातात. ही स्वरचिन्हे शीघ्राक्षरांना लेखणीच्या एकाच ओघात जोडली जातात.

**२. आ–साठी भरीव आवृत्त**

बाळबोध  च्या सुरवातीस जे भरीव वृत्त दिसते ते आपण घड्याळी गतीने काढतो. कोणत्याही रेखाक्षराच्या सुरवातीस अथवा शेवटी असे वृत्त काढता येते.

बाळबोध  हे कोराक्षर आहे. त्याच्या शेवटी जे भरीव वृत्त दिसते ते कोरीच्या शेवटी आत काढलेले आहे. तसेच वृत्त कोरींच्या सुरवातीसही काढता येते.


मराठीत सर्वात अधिक येणारा स्वर 'आ'. न–च्या सुरवातीस किंवा ग–च्या शेवटी जे भरीव वृत्त दिसते तो शीघ्रनागरीतील 'आ'. शीघ्राक्षराच्या सुरवातीस आल्यास त्याचा उच्चार प्रथम होतो; शेवटी आल्यास तो व्यंजनाबरोबर होतो. उच्चार 'आ' होतो म्हणून त्याला आवृत्त म्हणतात.

**३. आद्य आणि अंत्य 'आ'**


शीघ्राक्षरांच्या सुरवातीस आणि शेवटी येणारी आवृत्ते कोराक्षरांना

आतल्या बाजूस व रेखाक्षरांना घड्याळी गतीने काढावयाची असतात. उदा०

कोराक्षरे :–




रेखाक्षरे :–




## ४. दोन शीघ्राक्षरांमधील आवृत्ताचे कार्य

व्यंजनांना स्वर जोडणे हे स्वरवृत्तांचे भाषिक कार्य. तितकेच महत्त्वाचे त्यांचे दुसरे कार्य लिपिविषयक आहे. दोन अक्षरांच्यामध्ये स्वरवृत्ते येतात तेव्हा लेखणीचा ओघ, लेखनदिशा बदलली तरी, कुंठित न होता अधिक गतिप्रवण होतो. म्हणजे मध्य स्वरवृत्ताचे कार्य फ्रीव्हीलप्रमाणे होते. ते शब्दाला अलगदपणे पुढे आणून सोडते व एकंदर लिपीला गतिमान करते. शीघ्रलेखनाचा सराव करताना हे सहज ध्यानात येते.

## ५. मध्य स्वरवृत्त काढण्याचे स्थूल नियम

पुढील नियमात केवळ आवृत्ताचा उल्लेख आलेला आहे. हेच नियम नंतर परिचय होणाऱ्या ई–वृत्ताला व ए–वृत्ताला लागू पडतात.

(अ) दोन कोराक्षरांमधील आवृत्त :–

(i) दोन्ही कोरी एकाच वर्गातील असतील तर आवृत्त दोघींच्या-मध्ये येते :–

काक राळ पाप लाल वाव सास

(ii) एकाच दिशेने जाणाऱ्या दोन कोरींची तोंडे एकमेकींच्या विरुद्ध असतील तर आवृत्त पहिलीच्या पाठीवर व दुसरीच्या आत येते :–

गार घार पास साप काळ राग

(iii) इतर ठिकाणी

खाट डाव पाय फार गाल साल

भाग ठार वार हार बाळ डाग

(आ) दोन रेखाक्षरांमधील आवृत्त

(i) दोन रेखाक्षरात सरळ कोन होत असेल तर आवृत्त घडयाळी गतीने येते :—

जाच जाजा मामा नाना दादा

(ii) दोन रेखाक्षरात इतर कोन असेल तेव्हा आवृत्त कोनाचे बाहेर येते :–

जाम जाण धाम नाच तात

शात दाश ताज जात नाश

(ई) रेखाक्षर व कोराक्षरांमधील आवृत्त

(i) रेखाक्षर-कोराक्षर किंवा कोराक्षर-रेखाक्षर यांमधील आवृत्त कोरींच्या आत येते :—

चाक ताट थाट दाट नाक

नाग तार दार धार ताळ

जाळ जाब जार जाल जाव

(ii) काच काज पाच पाज लाच


लाज साच साज टाच डाच

कात गात घात हात बात

काम कान वाम लान ठाण

## गृहपाठ तिसरा

पुढील शीघ्रनागरी शब्द प्रथमपासून शेवटपर्यंत वाचा. नंतर त्यांची प्रतिलिपी करा; असे निदान पाच वेळा करा :—



# पाठ चौथा

## स्वर 'इ— ई'

### १. ई–चे पोकळ वृत्त

आवृत्त किंचित पोकळ काढल्यास ते ई-वृत्त होते म्हणजे त्याचा उच्चार ई होतो. भ-ध या छापील अक्षरांच्या सुरुवातीस किंवा छ-ढ या अक्षरांच्या शेवटी जो सूक्ष्म डोळा दिसतो तेवढे ई-वृत्त बारीक असावे. मागील पाठातील आवृत्ताप्रमाणेच ई-वृत्ताची शीघ्राक्षरांशी सर्वत्र जुळणी होते. उदाहरणार्थ :–

### २. आद्य 'इ' 'ई'

ईड ईद ईश इसम

इजा इजार इलाज इशारा

इमारत इनाम इलाखा इतका

### ३. पूर्णाक्षरित 'ई'

किरीट रिकामी गिरीश वडील

टिळा पिसा फिका बिघा

भिका भिवा विळा गिरकी

तिरडी परीट भिकारी विषारी

वीट रीळ तीन जीव ठीक

धीर पीठ मीठ वीज नीळ

किडा खिसा चिमा दिवा वही

कडी कमी कवी तशी भजी

आजी भाजी चावी माझी मांशी

आली गेली नेली हलली दिसली

ओतली टाकली भरली मानली वाटली

तिखट विमल विजय विचार

चिकट शिवण विहोण निवड

विहीर तिरळा कविता मासळी

### ४. शब्दान्ती येणारी स्वरोत्तर ई


शब्दान्ती येणारी ई पुढीलप्रमाणे शीघ्राक्षरित–ई काढून दाखवावी.

आई घाई माई देई घेई

रजई मलई जावई तिवई वसई

## गृहपाठ चौथा

पुढील शीघ्रनागरी शब्द प्रथमपासून शेवटपर्यंत वाचा. नंतर त्यांचीं पाच आवर्तने करा.



[ * या ओळीतील शब्दांत 'सुलभुक' आहे. पाठ ११, परि. ३ पाहा.]

## पाठ पाचवा

# स्वर ए—ऐ

**१. 'ए' वृत्त**

ई-वृत्ताची पोकळी दुप्पट केली की ते 'ए' वृत्त होते. म्हणजे त्याचा उच्चार ए होतो. ए-वृत्ताची शीघ्राक्षरांशी जुळणी सर्वत्र ई-वृत्ताप्रमाणे होते.

२. आद्य 'ए'

एक एकटा एकदा एवढा

**३. पूर्णाक्षरित ए**

रेघ पेच शेज केस खेळ

नेम हेर केर तेल वेल

देव नेस मेळ झेल ठेच

केशर बेरीज रेशीम लेखक बसले

येते जाते नेते बसते नेले

आले गेले

ए-वृत्त काढून त्यावर पार्श्वटिंब दिल्यास त्याचा उच्चार 'ऐ' होतो. उदाहरणार्थ,

४. **ऐ-साठी पार्श्वटिंब**

ऐक ऐट ऐपत ऐवज कैरी

कैंची कैदी जैन थैली दैव

दैना पैसा लैला वैर सैल

सैतान तैनात वैभव सैपाकी

## गृहपाठ पाचवा

पुढील (अ) व (आ) मधील शब्दांची शीघ्रनागरीत पाच आवर्तने करा :–

(अ) शेजारची शैला, वैनीचे शिवण, हैदरची बाग, करडीचे तेल, घरातील केर, माझे खेळ, आमचे वाचन, लेजीमचा आवाज, शेगडीची धग खडे पहारे, वेडे चाळे, रेशमी बेडी, कैरीची चव, पैशाची थैली, बैलाचे कान, पैरणीतील पैसा, सैतानाचे थैमान, कैंचीला धार, वैभवी बैरागी.


१. (आ)

२.

३.

४.

५.





## जलदवाचन पाठ–१ ला

**टप्पा पहिला :** छापलेला शीघ्रलिखित मजकूर वाचणे.

सुमारे १२० शब्द असलेला पुढील शीघ्रनागरी मजकूर जास्तीत जास्त लवकर वाचण्याची सवय करावयाची आहे. तूर्त हा मजकूर फक्त वाचनासाठी आहे. लिहिण्यासाठी नाही.

वेळेची नोंद करण्यासाठी सेकंद-काटा असलेले घड्याळ जवळ ठेवून वाचनास सुरुवात करावी. दिलेला मजकूर वाचण्यास समजा तुम्हाला ४ मिनिटे लागली. एकाच बैठकीत तो निदान पाच वेळा वाचा; दिवसातून असे ३–४ वेळा करा. दिवसाच्या शेवटी आपला वाचनवेग थोडाफार वाढल्याचे आढळून येईल. असे करता करता तोच मजकूर तुम्हाला दीड मिनिटात वाचता येऊ लागेल. तेथे वाचणे थांबवा. जलद वाचन ही जलद लेखनाची पहिली पायरी आहे.





**टप्पा दुसरा :** शीघ्रलिपीतील स्वलिखित मजकूर वाचणे.

दुसऱ्या टप्प्यात वरील मजकूर तुम्ही स्वतः शीघ्रलिपीत लिहावयाचा व तो तसाच कमीत कमी वेळात वाचण्याचा प्रयत्न करावयाचा. सुरुवातीस स्वलेखनात काही चुका सापडण्याचा संभव आहे; त्या दुरुस्त करून, पुन्हा वाचण्याचा क्रम चालू ठेवावयाचा. असे करीत दोन मिनिटात १२० शब्द वाचता येऊ लागले म्हणजे 'चांगली प्रगती' म्हणता येईल. मग पुढील पाठाकडे वळावे.

# पाठ सहावा

## स्वर उ — ऊ


### १. ऊ-ओ-औ-साठी अर्धवृत्त

ऊ, ओ, आणि औ हे स्वर शीघ्राक्षरांवर अर्धवृत्त काढून दाखवतात, ते कृ, पृ, मृ इ. मधील ऋकारासारखे छोटे ($\frac{1}{16}''$) असावेत.


### २. शब्दादि 'ऊ'

शब्दादि 'ऊ' शीघ्राक्षरांच्या सुरुवातीस पुढीलप्रमाणे काढावे :—

(अ) कोराक्षरे




(आ) रेखाक्षरे



उथळ उदाहरण उदार उधार उदास

ऊन उमा उसासा उलथा

(*सुलभुक)

३. शब्दमध्य पूर्णाक्षरित 'ऊ'

शब्दमध्य पूर्णाक्षरित 'ऊ'चे अर्धवृत्त कोणत्याही दोन अक्षरांना जोडते तेव्हा ते पुलाप्रमाणे दिसते. म्हणून त्याला सेतुवृत्त म्हणतात उदा.:-

खूप चूक जून डूल तूप

दूध धूप बूट रूप सूत

गुण दूर धूर धूळ भूक

मूठ मूल सूट भुई सुई

सेतुवृत्त काढण्याचा चांगला सराव झाल्यावर असे आढळेल की काही अक्षर-जोडयांच्यामध्ये दुसऱ्या बाजूस अर्धवृत्त काढल्यावर, त्या अर्धवृत्तातूनच लेखणी न थांबविता दुसऱ्या अक्षराची सुरुवात करता येते. अशा प्रकाराला संमीलित अर्धवृत्त म्हणतात. उदा.:-

कूळ गूळ घूस झूल पूल

फूल मूळ शूर चूल चूळ

धूम पूर मूक सूची सुरी


खुशाल तुकडा तरुण नुसता पुजारी

पाहुणा बुरुज रुमाल

संमीलित अर्धवृत्त लेखनात कणा-क्षणांची बचत करून त्यात सौकर्य आणते. ते काढण्यास लेखनात थोडी पूर्वयोजकता लागते. ती सरावाने येते. तसा विश्वास निर्माण होईपर्यंत नवशिकाऊंनी सगळीकडे सेतुवृत्त वापरावे.


**४. शब्दमध्य स्वरोत्तर 'ऊ'**

शब्दात येणारा स्वरोत्तर 'ऊ' ), याप्रमाणे जोडून कांढावा :–




**५. क्रियापदांचे ऊ–ऊन प्रत्यय**

बहुसंख्य मराठी धातू व्यंजनान्त आहेत. त्यांचे शेवटी अर्धवृत्त काढल्याने ऊ–ऊन प्रत्यय सिद्ध होतात. स्वरान्त धातूंना ), जोडून काढल्याने ऊ–ऊन सिद्ध होतात. उदा.:–





**६. 'ई–ऊं'चे ऱ्हस्व-दीर्घत्व**

मराठी उच्चारणात 'ई' आणि 'ऊ' हे कधी ऱ्हस्व होतात तर कधी दीर्घ होतात. पण तसे झाल्याने त्यांच्या अर्थामध्ये कुठेही फरक पडत नाही.

उदाहरणार्थ 'तीन ऊस' यातील ई व ऊ दीर्घ आहेत. पण जेव्हां या शब्दांचे सामान्यरूप होते तेव्हा तेच ऱ्हस्व होतात जसे "तिनाचा, उसाचा" म्हणजे संस्कृतप्रमाणे मराठीत ई–ऊ–चे ऱ्हस्वदीर्घत्व अर्थनिर्णायक नाही. म्हणून मराठीत एकच 'ई' व एकच 'ऊ' ठेवणे भाषाशास्त्रदृष्टचा यथायोग्य आहे. शीघ्रनागरीत तसे केले आहे. अर्थात बाळबोधमध्ये लिप्यंतर करताना ते प्रचलित शुद्धलेखन नियमाप्रमाणेच झाले पाहिजे.

## गृहपाठ सहावा

पुढील शीघ्रनागरी शब्द प्रथम वाचा. नंतर त्यांचीं प्रतिलिपी करा प्रत्येक प्रतिलिपी वाचा. असे पाच वेळा करा :—



## पाठ सातवा

# स्वर ओ

### १ 'ओटिब'

ऊच्या अर्धवृत्तावर टिब दिल्यास त्याचा उच्चार 'ओ' होतो. हे ओटिब होय. ओटिबाचा घोटाळा इतर कोणत्याही पार्श्वटिबाशी होणार नाही अशा ठिकाणी अर्धवृत्ताच्या या किंवा त्या बाजूस ते द्यावे.

### २ आद्य ओ

ओघ ओज़ ओठ ओढ ओत

ओल ओव ओळ ओस ओह

### ३ पूर्णाक्षरित ओ

कोट कोड गोड नोट पोट

फोड चोच बोच टोच झोत

घोष गोल भोक दोष ढोल


जोड दोर ढोर तोड मोल

पोर बोर चोर जोर ठोक

रोग घोर मोर झोप योग

### ४ तू–तो; लू–लो यांची स्वतंत्र शब्दाकृती


अन्त्य तू व लू-चे अर्धवृत्त अक्षरांच्या अंगाबरोबर तर अन्त्य तो-लो-चे अर्धवृत्त अक्षरांच्या टोकावर काढावे. तू-तो, लू-लो या जोडचांबाबत असा मूलभूत फरक केल्याने, त्यांचेबाबत अन्त्य ओ-साठी ओटिब काढावे लागत नाही. उदा.:-




### ५ तीव्र कोनावर सुटे स्वर


शब्दामध्ये शीघ्राक्षरांचे एकमेकांशी होणारे कोन क्वचित इतके तीव्र असतात की तेथे अंगभूत स्वरवृत्ते काढता येत नाहीत. अशा कोनांवर बाहेरच्या बाजूस पुढीलप्रमाणे सुटी स्वरचिन्हे दाखवावीत; त्यातील बहुतेक आपल्या पूर्वपरिचयाची आहेत :

स्वर । सुटे चिन्ह । वर्णन उ दा ह र णे




### ६ संगमकोनावर अंगछेद

काही कोनांची तीव्रता इतकी वाढत जाते की टोकाजवळ दोन्ही शीघ्राक्षरे एकरूप झालेली दिसतात. अशा मिटलेल्या कोनाला संगमकोन म्हणतात. संगमकोनावर अक्षरांचे पार्श्वटिंब (पाठ २) देता येत नाही; तेथे पुढीलप्रमाणे अंगछेद ($\frac{1}{16}$″) द्यावा :

 झटकन  झाडे  धावे

## गृहपाठ सातवा

पुढील शीघ्रनागरी मजकूर प्रथम वाचा. नंतर त्याची पाच वेळा प्रतिलिपी करा :



*(सुलभुक)


म. रा. शा. सं. मं. ग्रंथालय
ग्रंथालय

## पाठ आठवा

# औ


### १ 'औ' साठी छेदमात्रा

ऊच्या अर्धवृत्तावर छेदमात्रा (डॅश $\frac{1}{16}$") दिल्याने तो औ होतो. शब्दाद्य औ-ला छेदमात्रा अर्धवृत्ताच्या सुरुवातीस खाली दाखविल्याप्रमाणे जोडून काढावी; इतर ठिकाणी ती सुटी काढावी :




### २ पार्श्वटिबाने हकारयुक्त वर्ण

'घ, झ, ढ, ध, भ,' हे हकारयुक्त पंचवर्गीय वर्ण आपण पार्श्वटिबाने दाखवतो. न्ह, म्ह, ण्ह, ल्ह, न्ह, व्ह, हे मराठीचे आणखी सहा पंचवर्गीयत्तर हकारयुक्त वर्ण आहेत. तेही तसेच पार्श्वटिबाने दाखवावयाचे असतात. न-म-ण-र शीघ्राक्षरांच्या खालच्या बाजूस मधोमध आणि ल-व यांच्या उजव्या बाजूस मधोमध पार्श्वटिब दिल्याने हे वर्ण सिद्ध होतात :



ण्ह कण्हेरी कण्हतो

ऱ्ह तऱ्हा ऱ्हास

ल्ह जिल्हा कोल्हा

व्ह व्हावे चव्हाण

### ३ पार्श्वटिंबाने क्ष–ज्ञ

प-शीघ्राक्षराच्या उजव्या मध्यटिंबाने 'क्ष' सिद्ध होतो :—

क्षण क्षार क्षमा क्षेम

यक्ष कक्षा बक्षीस साक्षी

न-शीघ्राक्षराच्या खालच्या अंत्यटिंबाने 'ज्ञ' सिद्ध होतो :—

ज्ञान विज्ञान सूज्ञ ज्ञेय

### ४ क–ग–म–न– नंतर येणारा 'ह'

असा ह य-शीघ्राक्षराने दाखवावा :

महा महिला महसूल महिना


महागाई माहिती कहाणी स्नेही

काही

### ५ लवचिक कोरी


शीघ्रनागरीची कोराक्षरे म्हणजे कंपॉसने काढलेल्या भूमितीतील काटेकोर कोरी नसून हाताने काढावयाच्या लवचिक आकृती आहेत. त्यांच्या

या लवचिकपणामुळे दोन कोरींच्या तीव्र कोनावर येणारी स्वरवृत्ते थोडे पसरट वळण घेऊन काढता येतात. उदा.




## गृहपाठ आठवा

पुढील शीघ्रनागरी मजकूर प्रथम वाचा; नंतर त्याची पाच वेळा प्रतिलिपी करा :




(*सुलभक)

## पाठ नववा

# आद्य अ

### १ आद्य अ : अहुक


शब्दांच्या सुरुवातीचा अ शीघ्राक्षराला आद्य हूक काढून दाखवावा. हा अहुक होय. अहुक कोरींना आतल्या बाजूस आणि रेखाक्षरांना घड्याळी गतीने लागतो.


उदाहरणे –




### २ तंतोतंत पुनरुक्त शब्दांसाठी इंग्रजी 'व्ही'

मराठीत एखाद्या शब्दाची पुनरुक्ती होते; त्यात कानामात्रेचाही फरक नसतो. अशी तंतोतंत पुनरुक्ती साधारणपणे एकदा होते, पण क्वचित अधिक वेळांही होते. अशा शब्दाचे रूप एकदा पूर्ण काढावे व त्याच्या सन्निध टोकदार इंग्रजी व्ही-चे ( १/१६" ) लेखन करावे. एक ✓ शब्दाची एक पुनरावृत्ती दाखवते. पुनरुक्ती जितके वेळा झाली असेल तितके वेळा ✓ काढावी. उदा०–

 रामराम  बघता बघता  हसूनहसून

 पुन्हापुन्हा  धिक्, धिक्, धिक्  छे, छे, छे, छे !

## ३ 'ताना' प्रत्यय

'जाता, बसता, करता' इ० मधील ता-चे आवृत्त आपण घड्याळी गतीने काढतो. तेच विरुद्ध बाजूस उलट गतीने काढले की त्याचा उच्चार 'ताना' होतो. उदा. :–

 येताना  हसताना  बघताना

 उडताना  कापताना  नेताना

## ४ संक्षिप्त रूपे किंवा संक्षिप्ते

आपल्या रोजच्या लेखनव्यवहारात 'स. न. वि. वि., श्री., कु., सौ. प. पू. डॉ., म्यु., म. रा. वि. मं., इ०' कितीतरी संक्षिप्त रूपे (=संक्षिप्ते) वापरून आपण झटकन मोकळे होतो. भाषेत येणाऱ्या एक वा अनेक शब्दांसाठी संक्षिप्ते वापरण्याने केवळ कणाक्षणांची बचत होते असे नव्हे, तर वाचनात अचूकपणा येतो हे अधिक महत्त्वाचे आहे. समोर दिसणाऱ्या छोट्या रूपामागे कोणते पूर्ण रूप उभे आहे हे एका दृष्टिक्षेपात कळते. नेहमी येणाऱ्या काही शब्दांची अशी संक्षिप्ते या पाठापासून सुरू होत आहेत.

### संक्षिप्ते

| नागरी शब्द | शीघ्रनागरी संक्षिप्ते | वर्णन |
|---|---|---|
| आहे | . | साधे टिंब. आवृत्तातील आ येथे सुटा झाला आहे. |
| | .. | आहेत — द्विटिंबाने अनेकवचन. |

नाही ⁄ त-च्या दिशेने काढलेला (१/१६″) लांबीचा छेद (डॅश)

⁄⁄ नाहीत – दोन समांतर छेदांनी अनेकवचन.

आणि ० आणि – मधील हे मुटे ईवृत्त आहे.

व c अर्धवृत्त; हा बाळबोध व आहे.

(सूचना:—वरील संक्षिप्ते दोन रेषांच्या मधोमध काढावीत.)

**६ संक्षिप्तांचा वापर**




मी आहे, ती आहे आणि ते आहेत.



मी नाही, ती नाही व ते नाहीत.

## गृहपाठ नववा

पुढील शीघ्रनागरी मजकूर प्रथम वाचा, नंतर त्याची पाच आवर्तने करा



क्र. वा. वा. सं. मं. ग्रंथालय
ग्र/234/9
मंत्रालय

## पाठ दहावा


# ‘साया’

### १ साया

‘जो, तो, दे , घे, मोठा घोडा, जुने पुणे’ अशा मूळ शब्दांत या हे अक्षर नाही. पण त्यांच्या सामान्यरूपातून ते अचानक प्रकट होते व तेथे स्वयंभू जोडाक्षर तयार झालेले दिसते. जसे, ‘ज्या, त्या, द्या, घ्या, मोठ्या घोड्याने, जुन्या पुण्याचा’. या स्वयंभू जोडाक्षरांचे वैशिष्ट्य असे की ती शब्दातील मागील पदावर आघात आणीत नाहीत. मराठी लेखनात अशी निराघाती जोडाक्षरे वारंवार येतात. त्यातील ‘या’–ला साया (सामान्यरूपातील निराघाती या) असे नाव देण्यात आले आहे.

### २ सायाहूक

अतिशय उच्च वारंवारता असलेला साया शीघ्रनागरीत छोट्या हुकने दाखवतात. सायाची जुळणी ज्या मागील व्यंजनाक्षराबरोबर होते त्या अक्षराच्या शेवटी तो हूक काढण्यात येतो. जो हूक सायाचे अस्तित्व दर्शवतो तो सायाहूक. सायाहूक कोराक्षरांना आतल्या बाजूस व रेखाक्षरांना घड्याळी गतीने लागतो. उदाहरणे :



निऱ्या वाल्या डाव्या सह्या कळ्या

आल्या गेल्या पेरल्या भाजल्या हसल्या

### ३ सायाशी प्रत्ययजुळणी

जुळणी सुलभ असते तेव्हा प्रत्यय पुढीलप्रमाणे सायाहुकला जोडून काढावेत :

त्याने त्यांना त्यांनी त्यास

त्यात त्यातील ज्यास ज्याला

ज्याचा ज्याची ज्याचे ज्याच्या

डोक्याने डोक्यात वाऱ्याने वाऱ्यातील

ज्यावर त्यामुळे डोक्यावर डोक्यामुळे

### ४ सायाहूक ऐवजी सायाग्र

प्रत्ययांची सायाशी जुळणी तशी सहजसुलभ नसेल तर सायाहुक न काढताच प्रत्यक्ष शब्दाशी पुढीलप्रमाणे परस्पर जोडावा आणि मग साया सुटया बाणाग्राने दाखवावा. जे बाणाग्र सायाचे अस्तित्व दर्शवते त्याला सायाग्र म्हणतात. पंचवर्गातील पहिल्या व दुसऱ्या वर्णांसाठी आद्यस्थानी, तिसऱ्यासाठी मध्यस्थानी आणि चौथ्यासाठी अंत्यस्थानी व पंचवर्गीयतरांच्या मध्यस्थानी उजव्या / खालच्या बाजूस हे सायाग्र काढावे :

त्याला त्याचा त्यावर डोक्याचा

ज्याने ज्यातील वाऱ्याचा वाऱ्यावर

## संक्षिप्ते

कर (धातू) केवळ त-ण-ने सुरू होणाऱ्या प्रत्ययांपूर्वीचे रूप.

हो (धातू) केवळ त-ण-यई-ने सुरू होणाऱ्या प्रत्ययांपूर्वीचे रूप.

उदा. करतो करता करताना पण

करा करी करू.–रून इ.

होता होताना होतो होईल इ.

वर ही अव्यये मागील शब्दांना प्रत्ययाप्रमाणे लागतात. जोडणे शक्य

मुळे नसेल तेथे त्यांचे सन्निध लेखन करावे. उदा०

घरावर शाळेवर गावावर


सुद्धा माझ्यामुळे जगामुळे आईमुळे


साठी तूसुद्धा समितीसुद्धा भाऊसुद्धा

तुझ्यासाठी देशासाठी मुलासाठी

## गृहपाठ दहावा

पुढील शीघ्रनागरी मजकूर प्रथम वाचा, नंतर त्याची पाच आवर्तने करा :







## जलद वाचनपाठ २

**टप्पा पहिला**

पान २० वर जलद वाचनाचे प्रयोजन सांगितले आहे. तेथे दीड मिनिटात १२० शब्द वाचावयाचे होते. आता शब्दसंख्या १६० वर नेण्यात आली आहे; आणि कालमर्यादा अर्ध्या मिनिटाने वाढली आहे. पुढील मजकूर दोन मिनिटात वाचता आला पाहिजे—





वरील मजकुरात आलेल्या नव्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत :–

१) भारत, रशिया, नाशिक, इ. खाली समांतर छेद-जोडी दिसते आहे. तशी ती विशेषनामे व अनोळखी शब्दांखाली देत जावी.

२) 'वस्तू, वसलेले, पावसाची इ.' शब्दात 'वस'–चे सुलभ वळण दिसत आहे; त्यासाठी पाठ १५ पहा.

**टप्पा दुसरा**

वरील जलद वाचनपाठ स्वतः लिहून तीन मिनिटांत वाचता येऊ लागला की पुढील पाठाकडे वळावे.

## पाठ अकरावा



# अनुस्वार

### १ बाळबोध पद्धतीने अनुस्वार

शीर्षबिंदूने अनुस्वार ही बाळबोधमधील एक चतुरस्त्र लेखनक्लृप्ती आहे. स्थानपरत्वे एकाच शीर्षबिंदूचा बहुविध अनुनासकीय उच्चार होतो. जसे, अंक (अङ्क) अंजन (अञ्जन) मंडन (मण्डन) अंतर (अन्तर). अंबा (अम्बा), संरक्षण, सिंह/हंस संशय, आकांक्षा, किंवा, संक्रमण, आंध्र इ.

बाळबोधची क्लृप्ती शीघ्रनागरीत जशास तशी चालू ठेवण्यात आली आहे. अनुस्वारित पूर्णाक्षराच्या नंतर येणाऱ्या अक्षराच्या डाव्या / वरच्या बाजूस पार्श्वटिंब देऊन हा अनुस्वार दाखवावा. ते पहिल्या व दुसऱ्या पंच-वर्गीय अक्षरांसाठी प्रथमस्थानी, तिसऱ्यासाठी मध्यस्थानी व चौथ्यासाठी अंत्यस्थानी आणि पंचवर्गीयेतरांच्या मध्यस्थानी द्यावे. उदाहरणे :–



क–वर्ग

 अंक  पंख  भिंग  आंघोळ

 चांगला  पलंग  मुंगूस  आंगठा

च–वर्ग

 अंचल  पंचमी  वांछा  करंजी

 रोमांच  संचालक  ओंजळ  झंझावात

ट–वर्ग

खुंटा सुंठ तोंड भांडण

कंटाळा लपंडाव हुंडी चेंडू

त-वर्ग

अंतर जयंत विनंती अंदाज

सुंदर मंदिर हिंद संधी

प–वर्ग

कंपनी शिंपी पिंपळ गुंफा

मुंबई मोसंबी गंभीर जांभूळ

इतर

संयम संरक्षण संबंध संवाद

संशय संसद संहार संक्षेप


संज्ञा किंवा वंशज कंस


हंस मांस सिंह आकांक्षा


**२ षष्ठीचे अनेकवचन**

च – ला स्वरचिन्हे घड्याळी गतीने लागून षष्ठीचे एकवचनी प्रत्यय आपोआप तयार होतात. तीच चिन्हे उलटगतीने विरुद्ध बाजूस काढली की अनेकवचनी प्रत्यय सिद्ध होतात.

उदा:—



मुलाचा मुलांचा मुलीची मुलींची



कोटांचे हातांचे पायांचे शाखांचे


कवींच्या तारांच्या जुन्यांच्या वाडयांच्या

## ३ सुलभुक (सुलभ हूक)





लागोपाठ येणाऱ्या दोन शीघ्राक्षरांची जुळणी क्वचित अडचणीची भासते, किंवा पहिले शीघ्राक्षर संपून दुसरे कोठे सुरू होते हे निश्चित ठरवता येत नाही. असे असल्यास पहिल्या अक्षराच्या शेवटी छोटा हुक काढून मग त्या हुकला दुसरे अक्षर जोडावे. याची काही उदाहरणे मागील पाठातून आपण पाहिली आहेत. आणखी काही पुढे दिली आहेत :


मनन शहर चलन चहा


वटन कुशल नऊ वल्ही

जो काढल्याने अक्षरजुळणी सुलभ होते तो सुलभुक ; त्याला कोणतेही स्वरमूल्य नसते. म्हणजे तो काढल्याने कोणत्याही स्वराची भर पडत नाही.

### संक्षिप्ते

| शब्द | संक्षिप्ते | उदाहरणे |
|---|---|---|
| वेळ |  | शीघ्राक्षर ळ  ह्यावेळी  वेळेवर |
| वर्ष |  | शीघ्राक्षर व. खाली ष.  वर्षे  वर्षभर |
| पासून |  | 'पस' – चे छोटे रूप.  घरापासून |

पर्यंत शाळेपर्यंत गावापर्यंत

परंतु

पण


४ संक्षिप्तापासून नवे शब्द कसे होतात ?

पण पणा आपण आपणास आपणाला

लहानपणी मोठेपणी चांगुलपणा इ.

## गृहपाठ अकरावा

पुढील वाक्ये प्रथम वाचा, नंतर त्यांची शीघ्रनागरीत पाच वेळा प्रतिलिपी करा :




## पाठ बारावा

# त–चे रेखांकुर


### १ त–चा रेखांकुर

मराठी व्यंजनवर्णात त प्रथम क्रमांकावर आहे. शब्दांचे शेवटी बरेच वेळा दिसणारे पूर्णाक्षर त उच्चाराला वस्तुत: व्यंजन असते. व्यंजनासाठी पूर्णाक्षर खर्ची टाकणे म्हणजे कणाक्षणांचा अपव्यय होय. तो टाळण्यासाठी शीघ्रनागरीत त-चा केवळ अंकुर काढावा. यालाच त-चा रेखांकुर म्हणतात उदाहरणे–





### २ शब्दान्तीचा 'तात'

शब्दाच्या शेवटी त-रेखांकुराशेजारीच, त्याला समांतर व तितक्याच लांबीचा छेद काढल्यास दोहोंचा उच्चार 'तात' होतो. उदा०–




### ३ त–वर्णीय जोडी

शब्दाच्या सुरुवातीस अथवा शेवटी, दोन त–वर्गीय वर्ण लागोपाठ आल्यास तेही तातच्या समांतर छेदांनी लिहावेत. त्यातील दुसरा छेद पूर्ण काढल्यास त्याला इच्छित स्वर जोडता येतो. उदा०–





### ४ सुलभ वळण : पस––सप

पस—सप या सुलभ वळणात प–शीघ्राक्षर स-प्रमाणे ठेंगू करून संतुलन साधले जाते. त्यातील प-ला मध्य टिंब दिल्यास उच्चार बस––भस होतो उदा०–




### ५ क्रियापदांचे 'यला / वयाला' प्रत्यय

धातूंचे पूर्ण सामान्यरूप काढून ᒐ चे अधोलेखन केल्याने 'यला' ची आणि ᑫ चे अधोलेखन केल्याने 'वयाला' ची त्यात भर पडते. जसे,



दिसायला दिसावयाला खेळावयाला

कापावयाला धरावयाला सोडवायला

गावयाला हसावयाला बघावयाला

६ 'णार' प्रत्यय

मूळ धातू काढून त्याखाली ◡ चे अधोलेखन केल्यास धातूस 'णार' जोडला जातो. उदा०

करणार असणार होणार घेणार

दिसणारा पडणारी वाटणारे विचारणाऱ्या

हलणारे सांगणारी वाचणारा देणाऱ्या

## संक्षिप्ते


(टीप – पहिली चार संक्षिप्ते मागील शब्दांना जोडून काढावीत; जुळणी शक्य नसल्यास त्यांचे सन्निधलेखन करावे)

| शब्द | संक्षिप्ते | उ दा ह र णे | |
|---|---|---|---|
| बद्दल | | आईबद्दल | तुझ्याबद्दल |
| बरोबर | | त्याच्याबद्दल | भावाबरोबर |
| प्रमाणे | | गुरुजीबरोबर | ज्याप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| सारखा | मोठ्याप्रमाणे | त्याच्यासारखा |
| म्हण (धातू) | लहानासारखा | म्हणतो |
| | म्हणून | म्हणजे |
| | म्हणाला | म्हणेल |
| आपला | म्हणणारा | आपली |
| | आपले | आपल्या |

## गृहपाठ बारावा

पुढील वाक्यांचे प्रथम जलद वाचन करा; नंतर त्यांच्या पांच प्रतिलिपी करा :




## पाठ तेरावा

# न-च-चे रेखांकुर


### १ न–ण रेखांकुर

शब्दान्ती न-ण येण्याचे प्रमाण त-च्या खालोखाल आहे. त्यासाठी न-चा रेखांकुर (१/१६") काढावा. शब्दातील वर्णांवरून व संदर्भावरून अंकुर न-दर्शक आहे की ण-दर्शक आहे हे सहज कळते. उदा०–




### २ उत्तरपदे : षण / क्षण

शब्दान्ती येणारी षण / क्षण ही उत्तरपदे केवळ अन्त्य ष आणि क्ष-च्या लेखनाने दाखवितात, जसे,




### ३ च चा रेखांकुर

नंतर येतो च-चा रेखांकुर; तो मुख्यतः च-ज-साठी असतो. उदा०–

लाच-ज काच-ज पाच-ज सहज

टाच वीज शेज समज

साच-ज पेच-ज माच-ज गरज

### ४ लक्षवेधी 'च'

वाक्यातील एखाद्या शब्दाकडे खास लक्ष खेचून घेणारा शब्दान्तीचा 'च' वरील परि० ३ प्रमाणेच लिहावा. ह-शीघ्राक्षरानंतर किंवा इतरत्र जेथे तो शब्दाला जोडून काढता येत नाही, तेथे त्याचे सन्निधलेखन करावे. मात्र त्याची लांबी ($\frac{1}{16}$"), लेखनदिशा व उजवीकडील ६०°चा कोन यामध्ये किंचितही बदल होता कामा नये. जसे–

आहेच आहेतच नाहीच नाहीतच

हेच पाहाच दोनच गेलाच

### ५ सुलभ वळण : पह–पाह / बह –– बाह

प आणि ह ही दोन शीघ्राक्षरे मिळून होणाऱ्या सुलभ वळणात दोन्ही अक्षरांची लांबी सारखी करण्यात येते. या वळणावर येणारे काही लक्षणीय शब्द असे :

पहा पहिला पहातो पहाटे

पाहतात पाहिला पाहिल्यास पाहू-हून

वळणातील प-वर उजव्या बाजूस मध्य टिंब दिल्यास वळणाचा उच्चार बह–बाह होतो. जसे–

बहुमान बहाणा बहुधा बहिणी

बाहेर बाहेरून बाहेरील बाहेरचा

## संक्षिप्ते

| शब्द | संक्षिप्ते | उदाहरणे | | |
|---|---|---|---|---|
| झाला | | झाली | झाले | झालो |
| झालेला | | झालेले | झालेलो | झालेल्या |

[लक्षवेध – धातूंना जोडल्यास आणि हे भूतकाळाचे प्रत्यय होतात. जसे–

बसलेला नेली नेलेली

भरलेले वाटल्या वाटलेल्या

लागला . . . या प्रत्ययांचे लेखनधातूंच्या शक्यतो सन्निध करावयाचे म्हणजे त्या दोहोंपासून पुढील-

लागलेला . . . प्रमाणे संयुक्त क्रियापदे तयार होतात


बसू लागली करू लागल्या

पाहू लागले जाऊ लागले]

| | | | | |
|---|---|---|---|---|
| देश | | देशाचा | देशाने | देशाला |
| शेत | | शेताचा | शेताने | शेताला |
| पाहिजे-त | | ती पाहिजे | | त्या पाहिजेत |
| सर्व | | सर्वांना | सर्वांनी | सर्वांचो |

## गृहपाठ तेरावा

पुढील वाक्ये प्रथम वाचा; नंतर त्यांची शीघ्रनागरीत पाच वेळा प्रतिलिपी करा :




## पाठ चौदावा

# उत्तरवर्ण र


### १ उत्तरवर्ण 'र'

'क्रम, प्राण, वज्र' अशा जोडाक्षरात र उत्तरवर्ण म्हणजे दुसरा वर्ण असतो. ज्या पूर्ववर्णाशी त्याचा संयोग होतो त्या अक्षरावर अंगछेद ($\frac{1}{16}$") देऊन हा संयोग दाखवावा. संयोग पहिल्या व दुसऱ्या पंचवर्गीय वर्णांशी असल्यास अंगछेद प्रथमस्थानी, तिसऱ्याशी असल्यास मध्यस्थानी व चौथ्याशी असल्यास अन्त्यस्थानी आणि पंचवर्गीयेतराशी असल्यास मध्यस्थानी द्यावा. उदाहरणे –




**इंद्र–चंद्र**

इन्द्र–चन्द्र या शब्दातून दिसते तसे त्रिवर्णी जोडाक्षर आल्यास शीघ्राक्षराच्या डाव्या बाजूस जेथे अनुस्वारदर्शक टिंब पडते तेथे सुटा छेद दिल्याने तो त्रिवर्णदर्शक उच्चार साधला जातो. उदा०



२ ऋ

संस्कृत शब्दातून येणारा ऋ पुढीलप्रमाणे काढावा :

(अ) शब्दादि ऋ : ऋण ऋग्ण ऋषि

(आ) पूर्णाक्षरित ऋ-साठी र-चा अंगछेद व ऊ-चे अर्धवृत्त काढावे :

कृती संस्कृती तृषा

गृहस्थ दृढ मृत्यू

प्रवृत्ती सृष्टी हृदय

३ णे

बहुसंख्य मराठी धातू व्यंजनान्त आहेत. त्यांच्या शेवटी छोटा लूप काढल्याने त्यात णे-ची भर पडते. णे-लूप कोराक्षरांना आतल्या बाजूस आणि रेखाक्षरांना घड्याळी गतीने लागतो. उदा०—

करणे असणे वाटणे कापणे

धरणे समजणे वाचणे सुचणे

निजणे भाजणे ओतणे गुंतणे

बांधणे परतणे नमणे मानणे

म्हणणे आणणे

पण स्वरान्त धातूंचे बाबतीत ण-चे पूर्ण लेखन करावे लागते. जसे—

जाणे येणे देणे घेणे

**४ ण्या**

णे-लूपच्या शेजारी प्रत्ययांचे वा अव्ययांचे सन्निधलेखन केल्यास त्या लूपचा उच्चार ण्या होतो. उदा०–

करण्याचा    असण्याला    वाटण्यातील

वाचण्यामुळे    समजण्यासाठी    निजण्याने

म्हणण्याला    वांधण्यावर    मानण्याला

पण स्वरान्त धातूंच्या बाबतीत ण्या-चे लेखन पाठ १० प्रमाणे होते :


जाण्याचा    घेण्यामुळे    पिण्यावरून

## संक्षिप्ते

| शब्द | संक्षिप्ते | उदाहरणे | |
|---|---|---|---|
| राष्ट्र | | राष्ट्रे | राष्ट्रीय |
| राज-ज्य | | राजकीय | राज्यांनी |
| पं. प्रधान | | पं. प्रधानांनी | पं. प्रधानांचा |
| कोण-णी | | कोणत्या | कोणाचा |
| दोन | | दोन्ही | |

## गृहपाठ चौदावा

पुढील वाक्यांचे प्रथम जलद वाचन करा; नंतर त्यांच्या पाच प्रतिलिपी करा :



## पाठ पंधरावा

# पूर्ववर्ण र

### १ शब्दादि स्वरानंतरचा पूर्ववर्ण 'र'

कर्म (कर्–म) वार्ता (वार्–ता) अशा जोडाक्षरातील र पूर्ववर्ण आहे. शब्दादि स्वरोत्तर पूर्ववर्ण र-चे लेखन ‿ च्या सुरवातीस स्वर-चिन्ह काढून करावे. उदा०–

अर्चना आर्जव ईर्षा इर्ले

### २ पूर्णाक्षरा–नंतरचा पूर्ववर्ण 'र'

पूर्णाक्षरानंतर येणारा 'र' दोन पदातील पोकळीने साधला जातो. प्रथमपदाची पूर्णाकृती काढून तिच्या खाली दुसरे पद अशा तऱ्हेने काढावे की ते त्या प्रथमपदाकृतीने निदान अंशतः तरी झाकले जावे. अशा अधोलेखना-मुळे निर्माण झालेल्या पोकळीचा उच्चार 'र' होतो. उदा०

पर्वत अमर्याद निर्धार

आश्चर्य आकर्षक आशीर्वाद

निर्वाचित सार्वजनिक सार्वत्रिक

सार्वभौम स्वार्थ कीर्ती

## ३ ई–ईल प्रत्यय

(अ) स्वरान्त धातूंच्या शेवटी किंवा जोडून अथवा सुटी काढल्यास ई-ईल किंवा वी-वील ही प्रत्ययजोडी सिद्ध होते. उदा०–

खाई-ईल होई-ईल धुवी-वील

घेई-ईल नेई-ईल देई-ईल

येई-ईल पिई-ईल विई-ईल

(आ) व्यंजनान्त धातूंच्या शेवटी ई-वृत्त काढल्याने ई-ईल ही प्रत्ययजोडी सिद्ध होते. वाक्यसंदर्भात प्रत्यय ई आहे का ईल आहे हे स्पष्ट होते.–

घाली-ल काढी-ल भरी-ल

कापी-ल वाची-ल निवडी-ल

उचली-ल टाकी-ल पळवी-ल

## ४ 'एल प्रत्यय'

व्यंजनात धातूंच्या शेवटी ए-वृत्त काढून ते भग्न केल्यास एल हा भविष्य कालीन प्रत्यय सिद्ध होतो :

लागेल समजेल कळेल

असेल घडेल तापेल

उगवेल बसेल हलेल

जळेल ऐकेल विरेल

### ५ सुलभ वळण : वस--वास--विस

व आणि स या दोन शीघ्राक्षरांचे असे सुलभ वळण तयार होते. संदर्भाप्रमाण त्याचा उच्चार ' वस, वास, विस ' असा होतो. उदा०–

वसती वसाहत निवास

वसुमती वासुदेव विसरणे

एकवीस चोवीस पंचवीस

वस्तू विस्तार विस्तीर्ण

### ६ विसर्ग

अकारान्त शब्दांनन्तरचा विसर्ग तत्पूर्वीच्या शीघ्राक्षराला आवृत्त काढून दाखवावा. जसे–

पुन: स्वत: वस्तुत:


शतश: विशेषत: क्रमश:

## संक्षिप्ते

| शब्द | संक्षिप्त | उदाहरणे | |
|---|---|---|---|
| अर्थ | | आर्थिक | अर्थात् |
| पूर्व | | पूर्वी | पूर्वक |
| कारण | | कारणे | कारणाशिवाय |
| गोष्ट | | गोष्टी | |

## गृहपाठ पंधरावा

पुढील वाक्यांचे प्रथम जलद वाचन करा; नंतर त्यांची पाच वेळा प्रतिलिपी करा :





## जलद वाचन पाठ ३


**टप्पा पहिला**

येथवर संपलेल्या १५ पाठांतून शीघ्रनागरीची घडण जवळपास पूर्ण झाली आहे. उरलेल्या ५ पाठांत राहिलेल्या जोडाक्षरांचा परिचय होऊन

लिपीची घडण संपूर्ण होईल. पुढे शीघ्रनागरीत लिहिलेले दोन परिच्छेद आहेत. एकंदर शब्दसंख्या २४० वर आहे. एवढा मजकूर तीन मिनिटात वाचण्याचा सराव करावयाचा आहे. मधूनच एखादे अपरिचित जोडाक्षर किंवा संक्षिप्त आले तर त्याचे विवरण ज्या नंतरच्या पाठात येत आहे त्याचा क्रमांक त्या शब्दाच्या डोक्यावर लिहिलेला आहे :







### टप्पा दुसरा

मागील दोन जलदवाचन पाठांप्रमाणे वरील पाठ आता शीघ्रनागरीत लिहावयाचा आहे. स्वलिखित मजकूर चार मिनिटात वाचता येऊ लागला म्हणजे सराव थांबवावा.

## पाठ सोळावा

# पूर्ववर्ण 'स'

**पूर्ववर्ण 'स'**

जोडाक्षरात सर्वत्र आढळणारा 'स' पूर्ववर्ण असतो. स्त-स्थ, स्व आणि स्प-स्फ यातून तो वारंवार येतो.

**१ स्त–स्थ**

स-बरोबर त-शीघ्राक्षरही ठेंगू काढल्याने स्त-स्थ हे जोडाक्षर सिद्ध होते. शब्दातील वर्णसंदर्भावरून 'स्त का स्थ' हे स्पष्ट होत असल्याने थ-चे पार्श्वटिंब देण्याची गरज नसते. उदा०–

स्तर स्तुती स्थायी स्थिती

स्थूल स्थिर विस्तव स्थापना

जास्त रास्त प्रस्थ शिस्त

त-ला र-चा अंगछेद द्यावयाचा असेल तेव्हा तो सामान्य लांबीचा काढावा. जसे–


अस्त्र शस्त्र वस्त्र स्त्री

**२ स्प–स्फ**

स्प-स्फ-मधील स्, प-शीघ्राक्षराला बाहेरील बाजूस भरीव आद्यवृत्त काढून दाखवावा. जसे–


स्पर्श स्पष्ट स्पृश्य स्फटिक

भरीववृत्ताऐवजी पोकळ आद्यवृत्त काढल्यास त्याचा उच्चार 'अस्' होतो. जसे,





### ३ स्व आणि इतरांमधील पूर्ववर्ण 'स'

स्व आणि इतर सर्व जोडाक्षरातील पूर्ववर्ण स, स-चा अंकुर ($\frac{1}{16}''$) काढून दाखवावा. उदा.:




### ४ क्रियापदांची प्रयोजक रूपे

धातूंना प्रयोजक प्रत्यय लागण्यापूर्वी येणाऱ्या 'व' किंवा 'वि'चे-लेखन प्रत्ययांच्या सुरुवातीस व-चे संक्षिप्त (पाठ ९) जोडल्याने होते. उदा.:-




### ५ उत्तरपद : णुक—वणुक

नामातील णुक-वणुक हे उत्तरपद च्या जोड वा सन्निध लेखनाने पुढीलप्रमाणे साधावे :

पिळवणूक  फसवणूक  नेमणूक

मिरवणूक  गुंतवणूक  सोडवणूक

वागणूक  अडवणूक  हसवणूक

## ६ सुलभ वळण : कार

हे सुलभ वळण शब्दाला जोडून अथवा सन्निध काढल्यास त्यात 'कार'-ची भर पडते. सोईचे असेल तेथे कार-चे मिनिरूप (छोटे) काढता येते. उदा.:–

आकार  विकार  प्रकार

चुकार  होकार  नकार

साकार  बेकार  भिकार

कारखाना  कारभार  कारकीर्द

## संक्षिप्ते

बाबत–तीत  याबाबत

जवळ  जवळजवळ  जवळपास

इ.  इत्यादींचे  इ. मधून

पैकी  आपल्यापैकी  शिक्षकांपैकी

जनता  जनतेला  जनतेची

पेक्षा        त्यापेक्षा        कोणापेक्षा ?

चालू        चालू वर्षी        चालू गाड्यात

## गृहपाठ सोळावा

पुढील वाक्ये आवर्तन पद्धतीने पाच वेळा शीघ्रनागरीत लिहा:

१. जसजसे आम्ही जवळ आलो तसतशी किनाऱ्यावरील घरे, माणसे झाडे, वाहने इ. गोष्टी स्पष्ट दिसू लागल्या.

२. पूर्वापार चालत आलेल्या अनिवार्य अंगांपैकी हेरगिरी हे एक महत्त्वांचे अंग आहे.

३. पूर्वी ज्या गोष्टी करावयास प्रदीर्घ काळ लागावयाचा त्याच आता विज्ञानामुळे अगदी थोडक्या वेळात होऊ शकतात.

४. देशातील जनता जागृत असेल तर परकीय हस्तकांच्या अशा देशद्रोही कारवाया कधीच यशस्वी होत नाहीत.

५. शेजारची भांडकुदळ रशीदा आणि तिचा बोलघेवडा नवरा रफिक यांची दिवसभर चालणारी जुगलबंदी आमच्या करमणुकीचाच विषय होता.

६. प्रपंच आणि परमार्थ माणसाला दोन्ही एकाच वेळी साधावयाचे म्हणजे एक प्रकारची तारेवरची कसरतच की !

७. मदर तेरेसांनी कलकत्त्यात परित्यक्त अर्भके व अनाथांसाठी स्थापिलेल्या संस्थेचे नाव "निर्मल हृदय"

८. चंद्रभागा नदीकाठच्या सुमारे पाच हजार लोकांना गेल्या शुक्रवारी अतिवृष्टीमुळे सुरक्षित स्थळी तातडीने हलवावे लागले.

९. प्रशिक्षण शिबिरात खेळाडूंच्या बरोबर राहणाऱ्यांमधूनच राष्ट्रीय कबड्डी संघाचा व्यवस्थापक निवडला जाईल.

१०. लाल रंगाच्या पदार्थांचे कण ढगांत शिरल्यास त्यातून गळणाऱ्या पावसाला लाल रंग येतो तेव्हा त्याला 'रक्त वर्षाव' म्हणतात.

## पाठ सतरावा


# व्यंजनयुग्मे

### १ व्यंजनांचे दीर्घत्व

स्वरांप्रमाणे व्यंजनेही कधी कधी दीर्घ उच्चारली जातात. हे दीर्घत्त्व बालबोध लेखनात व्यंजनाचे द्वित्त काढून दाखवतात. द्वित्त्व शीघ्रनागरीत पार्श्वछेदाने ($\frac{१}{१६}$" ) दाखवण्यात येते.

### २ सजातीय व्यंजनयुग्मे

पंचवर्गातील पहिल्यां दोन वर्णासाठी पार्श्वछेद शीघ्राक्षराच्या आद्यस्थानी, तिसऱ्यासाठी मध्यस्थानी व चौथ्यासाठी अंत्यस्थानी आणि पंचवर्गीयेतरांच्या मध्यस्थानी उजव्या बाजूस काढावा, उदा०–




### ३ विजातीय व्यंजनयुग्मे

'क्त, प्त'–सारखी वारंवार येणारी किंवा ब्द, ब्ध, ब्ज, ग्न, ल्प – सारखी तुरळक येणारी भिन्नवर्गीय युग्मेही त्यातील प्रथम वर्णावर

वरील प्रमाणे पार्श्वछदाने दाखवावीत. उदा०—

सशक्त मुक्ता भक्ती

समाप्ती प्राप्ती दीप्ती

शब्द लब्ध प्रारब्ध

क्लृप्ती अब्जावधी कल्पना

लग्न मग्न विघ्न

४ सुलभ वळण : पर

या सुलभ वळणावर नेहमी येणारे काही शब्द व पदे अशी :

परदेश परमाणु परमेश्वर

पराकाष्ठा पराजय पराभव

परिणाम परिचय परिपत्रक

वळणाच्या मध्यावर उजवीकडे पार्श्वटिंब दिल्यास उच्चार बर / भर होतो

बरा बरे बरोबर

भरपूर भरदार भरजरी

हातभार गावभर वीतभर

अन्त्य भर-चे मिनिरूप काढल्यास त्यावर टिंब द्यावे लागत नाही.

### ५ अभ्यस्तासाठी उलटी व्ही

शब्दातील पहिल्या पदाची, उच्चारातील थोड्याशा फरकाने, पुनरावृत्ती होणे याला शब्दांची अभ्यस्तवृत्ती म्हणतात. अशा शब्दातील पहिले पद पूर्ण काढून त्याच्या सन्निध उलटी टोकदार इंग्रजी काढल्याने दुसरे पद सिद्ध होऊन तो शब्द पूर्ण होतो. उदा.

आरपार खटाटोप गुपचूप

आणीबाणी उलाढाल किरकोळ

अवतीभोवती ओबडधोबड जाणूनबुजून

हिडिसफिडीस टंगळमंगळ आसपास

### ६ तंतोतंतांना व अभ्यस्तांना लागणारे प्रत्यय

असे प्रत्यय उलट सुलट व्ही-पूर्वी अथवा नंतर योग्यस्थानी पुढीलप्रमाणे काढावेत.

बडबडते हळहळली अडमडलो




घरातल्या घरात बाहेरच्या बाहेर

गावोगावच्या मुलांमुलींना

## संक्षिप्ते

क्षण-णी क्षणभर याक्षणी

रुपया रुपये लाखो रुपये

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सुरू |  | सुरू झाले |  | सुरुवात झाली |
| साहेब |  | दादासाहेब |  | माईसाहेब |
| लोक |  | लोकसभा |  | लोकसत्ता |
| आवश्यक-ता |  | त्याची आवश्यकता |  | अवश्य |

## गृहपाठ सतरावा

पुढील वाक्ये आवर्तन पद्धतीने पाच वेळा शीघ्रनागरीत लिहा :–

१. मोटारगाड्यांची सुरुवात होण्यापूर्वी मुंबईस घोड्याच्या व्हिक्टोरियाचा व इतर शहरातून बग्गीचा सर्रास उपयोग होत असे.

२. अप्पासाहेब लठ्ठे हे सरदार अण्णासाहेबांचे धाकटे बंधू; सव्वा वर्षापूर्वी घोड्यावरून पडल्यामुळे ते एका पायाने अधू झाले आहेत.

३. व्यसनी ब्रिजलालने वडिलोपार्जित संपत्तीचा मिळालेला मोठ्ठा हिस्सा रेस व सट्टेबाजीत घालवला.

४. भक्तीची मावसबहीण दीप्ती सत्ताविसाव्या वर्षी लग्न झाल्यावर जी अमेरिकेस गेली ती आज पस्तीस वर्षे तिकडेच आहे.

५. आणीबाणीच्या काळात हसनने जी लक्षावधी रुपयांची उलाढाल केली ती अंगाशी येऊन शवटी तो कफल्लक झाला.

६. तामीळ भाषिकांच्या समस्या सोडविण्यासाठी श्री. पार्थसारथी श्रीलंकेच्या अध्यक्षांना भेटावयास उद्या येथून निघत आहेत.

७. राज्याच्या पाटबंधारे विभागाने धरणातून खळाळणाऱ्या पाण्याचे वेळीच नियंत्रण केल्याने तीर्थक्षेत्र पंढरपूरवरील संभाव्य भीषण धोका टळला.


८. रवींद्र कुलकर्णीने महेश नाडकर्णीचा ६–२ असा पराभव करून ठाणे जिल्हा एकेरी टेनिस स्पर्धा जिंकली.

## पाठ अठरावा


# नकारात्मक क्रियापदे, नावाची आद्याक्षरे

### क्रियापदांची नकारात्मक रूपे

'नव्हता, नसता' अशा क्रियापदांतील नकारदर्शक 'न' पुढीलप्रमाणे जोडलेल्या आद्य छेदाने ($\frac{1}{16}$") दाखवावा.


 होता  नव्हता  होत्या  नव्हत्या

 नसताना  नव्हेस  नसला  नसू

 नसल्यास  नसल्यामुळे  नसल्यासारखे

### १ उत्तरपद 'वार'


उत्तरपद वार-साठी  चे जोड वा सन्निधलेखन करावे. उदा.

 उमेदवार  तपशीलवार  आकडेवार

 अनेकवार  सभोवार  जिल्हावार

### २ आठवड्याचे वार



आठवड्याच्या वारांसाठी पुढील प्रमाणे संक्षिप्त सन्निधलेखन करावे :–



 रविवार  सोमवार  मंगळवार  बुधवार


 गुरुवार  शुक्रवार  शनिवार

### ३ सुटा 'अ'

नावाच्या आद्याक्षरात, गणितात किंवा इतरत्र अ-चा (आणि इतर अक्षरांचाही) सुटा उपयोग करावा लागतो. तेथे तो हलन्तासारखा छोटा छेद (",,) दोन रेषांच्या मधोमध काढून दाखवावा. उदा.



 अ. अ. अलुरकर  आ. ई. बेंजामिन

 ए. उ. पाटील  ओ. अ. कुरेशी

 अबक त्रिकोण  ब गट





### ४ अनुस्वारित आद्याक्षरे


नावांच्या आद्याक्षरांवरील अनुस्वार पुढील प्रमाणे द्विटिंबाने दाखवावा:

 ल. चिं. बेंद्रे  चं. धों. झांब्रे



### ५ पूर्ववर्ण ष



(अ) ष पूर्ववर्ण असलेल्या जोडाक्षरांत ष्ट चे प्रमाण थोडे अधिक आहे. ते जोडाक्षर काढण्यासाठी ष-बरोबर ट-ही ठेंगू काढावा. उदा०–




 कष्ट  खाष्ट  नष्ट  दुष्ट

 गोष्ट  संतुष्ट  बलिष्ठ  चेष्टा

(आ) इतर जोडाक्षरे लिहिण्यासाठी ष-चा अंकुर काढावा.

 उष्ण  लष्कर  निष्काळजी

 निष्फळ  निष्पाप  निष्कपट

 निष्कासित  निष्णात  निष्प्राण

### ६ बाळबोध संक्षिप्तांचे लिप्यंतर

आपल्या रोजच्या पत्रव्यवहारात 'स. न. वि. वि., ती., चि., कु., सौ., श्री., आ. वि. (आपला विश्वासु) इ. संक्षिप्त रूपे आपण वापरतो. ती सर्व जशीच्या तशी, किंवा अधिक आटोपशीर करून शीघ्रनागरीत लिप्यंतरित करता येतात. राज्यप्रशासन, शिक्षण, न्याय, पोलिस, दळणवळण, बँकिंग, व्यापार-उदीम अशा ज्या ज्या क्षेत्रात आता मराठीचा वापर होऊ घातला आहे, तेथेही अनेक संक्षिप्ते त्या त्या विभागापुरती मर्यादित असतात शीघ्रनागरीत यांचेही सुलभीकरण करता यते. याची काही उदाहरणे नमुना म्हणून पुढे दिली आहेत. शीघ्रलेखकांनी आपापल्या विभागातील संक्षिप्ते त्या धर्तीवर सुलभ करण्याचा प्रयत्न येथपासूनच सुरू करावा :

स. न. वि. वि. ति. चि. कु. श्री.

आ. वि. म. रे. प. रे. द. रे (दक्षिण रेल्वे).,

मु. म. न. पा. (मुंबई महानगरपालिका)

पु. म. न. प. ना ना. म. न. पा.

ना. दा. म. वि. म. रा. वि. म.

## संक्षिप्ते

ऐवजी लष्कराऐवजी बांबूऐवजी

जिल्हा मुंबई जिल्हा जिल्हावार

शिवाय गरजेशिवाय आईशिवाय

शेवटी वर्षाच्या शेवटी शेवटी शेवटी

मंडळ महामंडळ नाटक मंडळी

मंत्री म्यु. मंत्री गृहमंत्री

संध्याकाळी काल संध्याकाळी

## गृहपाठ अठरावा

पुढील वाक्ये आवर्तन पद्धतीने पाच वेळा शीघ्रनागरीत लिहा. :

१. गेल्या सोमवारी नवी दिल्लीच्या सब्जी मंडी विभागात एक घर कोसळल्याने एकूण सहा व्यक्ती ठार झाल्या.

२. काही उमेदवारांनी आवश्यक ती तपशीलवार माहिती दिली नसल्याने त्यांचे अर्ज स्वीकारता आलेले नाहीत.

३. कृषिमंत्र्यांनी अशी जिल्हावार आकडेवारी आधीच दिली असती तर सदनात असा अपूर्व गोंधळ माजला नसता.

४. गुरुवारी झालेल्या रेल्वे महामंडळाच्या बैठकीत म. रे. चे महाव्यवस्थापक श्री. ओ. यू. पिंटो यांनी हे स्पष्ट केले.

५. श्री. सं. धों. मालुसरे हे पन्हाळ्याचे तहसीलदार काल येथील विकासखंडाची पाहणी करण्यास आले होते.

६. पाकिस्तानच्या ३६ व्या स्वातंत्र्यदिनी अध्यक्ष ज. झिया यांनी १९८५ च्या मार्च मध्ये देशात सार्वत्रिक निवडणुका करण्याची घोषणा केली.


७. मुं. म. न. पा. ने आपल्या सत्तर लाख नागरिकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोई इतर म. न. पां.नी आदर्श समजाव्या अशा आहेत.

## पाठ एकोणिसावा

# उत्तरवर्ण य; ॲ-ऑ; संख्यालेखन

**बाणाग्राने उत्तरवर्णी 'य'**

उत्तरवर्णी य-ची जोडाक्षरे शब्दातील मागील पदावर आघात आणतात. हा आघात सामान्यरूपातूनही कायम असतो. ज्यांच्याशी य-चा संयोग उत्तरवर्ण म्हणून होतो अशा पूर्ववर्णी शीघ्राक्षरांच्या उजव्या / खालच्या बाजूस त्या त्या चिन्हस्थानाकडे टोक असलेले बाणाग्र काढून तो दाखवावा. उदा०–




**१ स्वर ॲ, ऑ**

आपल्या वापरात तुरळक इंग्रजी तत्सम शब्द यतात; त्यांतील ॲ-ऑ स्वर लिहिण्यासाठी पुढील पद्धत वापरावी :

(अ) शीघ्राक्षरांच्या उजव्या/खालच्या बाजूस सायाग्र काढल्याने (पाठ १०) त्याचा पर्यायी उच्चार अॅ होतो. जसे,–


कॅच वॅट रॅश मॅप

(आ) शीघ्राक्षराच्या शेवटी आवृत्त काढून त्यावर औची छेदमात्रा ($\frac{1}{16}$") दिल्यास त्या दोहोंचा उच्चार ऑ होतो. जसे,

कॉफी डॉ. लॉस वॉश

## २ संख्यालेखन

शीघ्रनागरीत १ ते ९ अंकांचे लेखन पुढीलप्रमाणे करावे :



नागरी संख्यालेखन स्थितिलेखनाचे तत्त्वावर बसलेले आहे. उदा० ५२,२७,३५५, ही संख्या वाचताना 'लक्ष, हजार, शे' हे तेथे न लिहिलेले शब्ददेखील आपण स्थानपरत्वे वाचतो. त्यामुळे नागरी संख्यालेखन आटोपशीर झाले आहे; शीघ्रनागरीत ते तसेच चालू ठेवावे. मात्र शीघ्राक्षरे व नागरी अंक यांच्यामध्ये क्वचित होणारा घोटाळा टाळण्यासाठी नागरी अंक लिहिल्याबरोबर त्यांचे खाली सर्पगती रेषा काढावी. उदा०–

२२२ ९२७ ३५२८ २७, ८४२

## ३ द्विटिंबाने अन्त्य 'अ'

'तुझं, कसं, झालं' अशा शब्दातील शेवटचा अनुस्वार तेथे अ-चे अस्तित्त्व दर्शवतो. हा अन्त्य अ शीघ्राक्षरांच्या उजव्या/खालच्या बाजूस त्या त्या स्थानी द्विटिंब काढून दाखवावा. उदा०–

वाकं मागं काजं त्याचं

तुझं कडं गीतं खारं

कसं हवं बरं व्हावं

**४ उपान्त्य अक्षरावरील अनुस्वार**

मराठी लेखनात आढळणारा उपान्त्य अक्षरावरील अनुस्वारही द्विटिंबाने पुढीलप्रमाणे दाखवावा :

यास यांस त्यास त्यांस

ज्यास ज्यांस माइंस अण्णांस

## संक्षिप्ते

घे (धातू) घेतो घेतला

उद्योग औद्योगिक उद्योगधंदा

कार्यालय कार्यालयीन कार्यकारी

विद्या विद्यापीठ विद्यालय

संस्कृत संस्कृती सांस्कृतिक

सुसंस्कृत असंस्कृत

योजना पंचवार्षिक योजना

दृष्टीने या दृष्टीने सर्व दृष्टीनी

## गृहपाठ एकोणिसावा

(अ) पुढील वाक्ये आवर्तन पद्धतीने पाच वेळा शीघ्रनागरीत लिहा :

१. स्वयंपाकगृहात वापरल्या जाणाऱ्या कुकिंग गॅसबद्दल गृहिणींनी सदैव सावधानता बाळगणे आवश्यक आहे.

२. औद्योगिक व आर्थिक विकासाशिवाय समाजाचा सांस्कृतिक स्तर उंचावू शकत नाही याचा पुनः प्रत्यय येथवरच्या यशस्वी पंच-वार्षिक योजनांद्वारा आपणाला मिळाला आहे.

३. अहवालात नमूद करण्यात आल्यानुसार देशातील १९,१४४ नियतकालिकांपैकी खाजगी मालकीची १२,५२१ आणि बाकीची संस्था व संघटनांच्या मालकीची अशी वर्गवारी आहे.

४. आपल्या बापाकडून एवढीशी ज्वारी नेणं तिला पसंत नव्हतं. एवढ्या मोठ्या अपेक्षेनं ती आली होती आणि एवढंसं चुंगडं घेऊन ती निघाली होती. त्यापेक्षा तेवढंही न घेता ती निघाली असती तर तिला बरं वाटलं असतं; पण आपण असं केलं तर आपल्या वडलांना वाईट वाटेल, आपली लेक आपल्यावर रागावून आपण दिलेले जोंधळे टाकून गेली, असं त्यांना वाटेल म्हणून ती मुकाट्यानं गाडीत बसली.

(आ) पुढील पत्राच्या शीघ्रनागरीत पाच प्रतिलिपी करा :

श्री ३२७, स्टेट बँक कॉलनी,
चंद्रपूर (महाराष्ट्र), ४४२४०१
१ ऑक्टोबर १९८३

ती. सौ. आईस शिर साष्टांग नमस्कार,

तुझे सत्तावीसचे पत्र मिळाले. यंदा नव्याने उघडलेल्या इतर एंजिनिअरिंग कॉलेजांप्रमाणे आमचेही फार उशिरा सुरू झाले. विसापैकी तीन प्राध्यापकांची नेमणूक अद्याप व्हायची आहे; ग्रंथालयाची जेमतेम निम्मी पुस्तकं आली आहेत. इतर गोष्टी बऱ्याचशा जमत आल्या आहेत.

सौ. सुनेत्राकाकूंनी माझी सगळी व्यवस्था कशी टॉप ठेवली आहे! कॉलेज संपल्यावर थोडे खाऊन तासभर बॅडमिंटन खेळून येतो; कधी मित्रांबरोबर फिरायला जातो. अभ्यासक्रम घाईघाईने पुरा होत असल्याने रात्री उशिरापर्यंत जागून मागची उजळणी नी दुसऱ्या दिवसाची तयारी करावी लागते. सॉलिड तारांबळ उडते बघ!

इकडे येताना भेंडी, वांगी, मिर्ची, काकडी मागील परसात लावल्या होत्या. त्यातलं काही आलं का ग? तिकडचं सगळं आता प्रज्ञा बघत असेल. दिवाळीत येईन तेव्हा खूप काही झालेलं दिसेल नाही?

शेजारचा मुकेश रोज येतो का? नी संजीवनी? सर्वांची सारखी आठवण यते. यायचा एकेक दिवस मोजतोय बघ!

ती. बापूंस नि माईंस नमस्कार; पिंट्यास आशिर्वाद,


तुझा,
राजीव.

## पाठ विसावा

# उत्तरवर्ण 'व'

**सुटया अर्धवृत्ताने उत्तरवर्ण 'व'**


बाळबोधमध्ये 'विद्वान, द्वंद्व,' अशा जोडाक्षरात उत्तरवर्ण 'व'द-च्या कडेवर बसलेला आहे. नव्या लिपीतही तो तसाच पूर्ववर्णी शीघ्राक्षराच्या उजव्या/खालच्या बाजूस, त्या त्या चिन्हस्थानी पुढीलप्रमाणे सुटे अर्धवृत्त काढून दाखवावा. पूर्ववर्ण 'ध'-च्या वेळी जेव्हा दोन अक्षरांत तीव्र कोन होतो तेव्हा तो सोईसाठी डावीकडे काढावा.



| | | |
|---|---|---|
| तत्व | ममत्व | महत्व |
| अंधत्व | भीरुत्व | शूरत्व |
| द्वार | द्वितीय | विद्वान |
| ध्वज | उध्वस्त | विध्वंस |
| कर्तृत्व | दातृत्व | नेतृत्व |
| भोक्तृत्व | वक्तृत्व | शतृत्व |
| क्वचित | पक्वान्न | ज्वारी |
| अश्व | विश्वास | ईश्वर |
| नश्वर | एश्वर्य | परमेश्वर |

### १ स्वतः साधाबयाची संक्षिप्ते

सर्वनामे, अव्यये, धातू, यासारखे भाषेच्या वापरात पुन्हा पुन्हा येणारे शब्द छोटे छोटे असतात. हा अलिखित नियमच आहे! सर्वनामे म्हणजे तरी भाषेने स्वतःच तयार केलेली मोठमोठ्या शब्दांची संक्षिप्तेच ना? शब्द छोटे तशा त्यांच्या आकृती छोट्या. सतत वापरात असल्यामुळे अशा आकृती लवकर लक्षात राहतात. तशा त्या राहिल्या म्हणजे त्यांच्यातील एखाद-दुसरा वर्ण किंवा पार्श्वचिन्ह विश्वासपूर्वक गाळता येते. उदाहरणार्थ, ज्यांना तसा आत्मविश्वास आला असेल त्यांनी पुढील शब्दांवरील पार्श्वटिंबे व सायाग्रे खुशाल गाळावीत :




येथे शीघ्रनागरीची मांडणी पूर्ण झाली आहे.

### २ यानंतरचे जलदवाचन पाठ व परिशिष्टे

पाठ १० ते १९ मध्ये आलेल्या संक्षिप्तांची वर्णक्रमानुसार एकत्रित केलेली यादी परिशिष्ट-१ मध्ये; गृहपाठातून आलेल्या बाळबोध मजकुराचे शीघ्रनागरी लिप्यंतर परिशिष्ट-२ मध्ये आणि शीघ्रनागरी मजकुराचे बाळबोध लिप्यंतर परिशिष्ट-३ मध्ये दिले आहे.

यानंतर येणाऱ्या जलद वाचन पाठांसाठी निवडलेले सलग लेख पुणे विद्यार्थी गृहाने प्रकाशित केलेल्या डॉ. ग. श्री. खैर यांच्या 'सदाचार-चिंतनी' या मालिकेत प्रसिद्ध झालेल्या भाग १ ते ५ मधून, उभयतांच्या सौजन्याने, घेतलेले आहेत. लेखांची शीर्षके तेवढी बाळबोधमध्ये व लेख

शीघ्रनागरीत आहेत. शीर्षकापूर्वी देण्यात आलेला दशांशचिन्हांकित आकडा भाग क्रमांक व लेख क्रमांक दर्शवतो. उदाहरणार्थ १.५० म्हणजे पहिल्या भागातील ५० वा लेख.


या जलदवाचन पाठातील काही संक्षिप्ते पाठ २० मधील परि० १ प्रमाणे तयार झालेली आहेत.

## जलदवाचन पाठ

### १.५० व्यवहारज्ञान म्हणजे काय ?

**नवे शब्द व संक्षिप्ते**


| | | |
|---|---|---|
| प्रत्येक | योग-ग्य | उपयोग-गी |
| मान-ग | समान | प्रमाण |
| मान्य | सामान्य | अमान्य |
| माणूस | माणसे | माणसाला |
| ठरतो | ठरलेले | ठराव |
| मनुष्य | मनुष्याचा | मनष्याने |
| शिक्षण | अनेक | किंवा |
| व्यवहार | ज्ञान | संबंधी |





# १.५३ तुमच्या आरोग्याचे रहस्य

**नवे शब्द व संक्षिप्ते**

| | | |
|---|---|---|
| जन्म | जन्मापासून | जन्मभर |
| पूर्ण | पूर्णपणे | संपूर्णपणे |
| रोग | रुग्ण | आरोग्य |
| विषयी | कितीतरी | वाचन |
| फार | थोडे | पुष्कळ |
| तज्ञ | असेल तर | चांगला |
| नंतर | नाही तर | नाही तरी |
| रोज | दररोज | अत्याचार |
| अत्यंत | जरूरी | अत्यावश्यक |









## १.८८ तुमचा व्यवसाय होच देशसेवा

### नवे शब्द व संक्षिप्ते

| | | |
|---|---|---|
| आस्थापूर्वक | उत्कृष्ट | रीतीने |
| आपापले | देशव्यापी | कारखाना |
| महत्त्वाचे | कामगार | दृष्टीने |
| वातावरण | माणसांशी | त्याचे संबंध |
| सरकार-री | म्यु. चे | कारकून |
| प्रामाणिकपणे | चमत्कार | आपोआप |
| स्वार्थत्याग | सद्‌गुण | व्याख्या |







## १.९९ मानसिक विश्रांती

**नवे शब्द व संक्षिप्ते**


| | | |
|---|---|---|
| स्थिती | सुधारणा | संस्कृतीमध्ये |
| क्षेत्रात | कार्यक्रम | कळत न कळत |
| पूर्वीच्या | वाढविणे | ताजेतवाने |
| संवर्धन | एकदोन | प्रक्षोभापासून |







## ४ ४२ असामान्य जीवनाचे रहस्य

| | | |
|---|---|---|
| विशेष | वैशिष्टय | दाखवणाऱ्या |
| त्यावेळी | वायफळ | घालवणाऱ्या |
| वाङ्मय | त्यासंबंधी | मराठीत |
| निश्चित | पिटण्यात | कोणता तरी |
| अथवा | अंतर्मुख | स्वरुपात |
| तत्त्वज्ञ | तत्त्वज्ञान | कालांतराने |
| प्रस्थापित | नवनवीन | योगायोगाने |







## ५.५ लोकशाही मनोवृत्ती

### नवे शब्द व संक्षिप्ते


लोकशाही
मनोवृत्ती
आविष्कार
मुक्तपणाने
विचारशक्ती
विरुद्ध
बहुसंख्य
अल्पसंख्य
विरोधी
अप्रगत
परस्परांना
मानून
अविकसित
उपयुक्त
सवंत्र
येथपासून
वरपर्यंत


कार्यवाही मानवाची जबाबदारी

दृढमूल परिणाम-मी परंपरा

देखील क्रियाप्रतिक्रिया आज्ञापालन

पध्दत–ति लोकशाही मनोवृत्ती





# परिशिष्ट–१

१ ते १९ पाठांत आलेल्या संक्षिप्तांची वर्णक्रमानुसार यादी
[संक्षिप्तापुढील आकडा पाठाचा क्रमांक दर्शवतो]

अर्थं –१५
आणि – ९
आपला –१२
आहे – ९
आवश्यक –१७
इ. –१६
उद्योग –१९
ऐवजी –१८

कर(धातू)–१०
कारण –१५
कार्यालय –१९
कोण –१४
क्षण –१७
गोष्ट –१५
घे (धातू) –१९

चालू –१६
जवळ –१६
जनता –१६
जिल्हा –१८
झाला –१३
झालेला –१३
देश –१३
दोन –१४

दृष्टीने –१९
नाही – ९
पण –११
पं. प्रधान –१४
परंतु –११
पर्यंत –११
पासून –११
पाहिजे –१३
पूर्व-क –१५
पेक्षा –१६
पैकी –१६
प्रमाणे –१२

बद्दल –१२
बरोबर –१२
बाबत-तीत –१६
मंडळ –१८
मंत्री –१८
मुळे –१०
म्हण (धातू) –१२
योजना –१९

राज-ज्य –१४
राष्ट्र –१४
रुपया –१७

लागला –१३
लागलेला –१३
लोक –१७

व – ९
वर –१०
वर्ष –११
विद्या –१९
वेळ –११

शिवाय –१८
शेत –१३
शेवटी –१८


संध्याकाळ –१८
संस्कृत –१९
सर्व –१३
साठी –१०
सारखा –१२
साहेब –१७
सुद्धा –१०
सुरू –१७

हो (धातू) –१०


## परिशिष्ट—२

### गृहपाठ पहिला

(अ)




(आ)




## गृहपाठ दुसरा

(अ) (i)





(आ) (ii)




## गृहपाठ पाचवा


(अ)






## गृहपाठ सोळावा





## गृहपाठ सतरावा



৩

৪

৫


৬

৭

৮

৯-২

## गृहपाठ अठरावा



७

## गृहपाठ एकोणिसावा

(अ)

१

२

३.

१३,१८८ १२,५२१


४

(आ)

३२८

४४२,४०१

१९८३



१.१०.८३

# परिशिष्ट—३

## गृहपाठ दुसरा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (आ) | कमर, | कलश, | गवत, | गवर, |
| | चटक, | बचत, | जखड, | दगड, |
| | पटल, | चघळ, | रजत, | सकळ, |
| | सवत, | हसन, | लवकर, | पसरट, |
| | टरकन, | सवलत, | कचकच, | बरसत. |
| | पटकन, | घनफळ, | दहशत, | मरगळ, |
| | खडतर, | कसरत, | हरकत, | वळचण, |
| | बरकत, | सटकन, | | |

## गृहपाठ तिसरा

आगर, आढळ, आदर, आवड, आसव, आकार, आराम,
आकाश, आचार, आणाल, आरास, आवार, आवास, आहात,
काका, जाजा, टाटा, दादा, बाबा, मामा, लाला,
खाडा, धारा, डावा, फासा, वारा, नानाचा, दादांना,
गावात, चाकात, जावात, झालात, नाकाला, हाताला, दाराला

## गृहपाठ चौथा

१. कीव, जीभ, ढीग, तीन, बीज, नीज, वीस, शीळ,
२. कामी, छाती, ठाई, भाजी, माशी, राणी, वाई, शाई
३. किती, मिशी, निधी, तिटी, भिशी, मिरी, लिपी, विटी
४. इतर, इसम, चिवट, दिवस, पितळ, शीतल, मिसळ, चिखल

५. घाई, ताई, बाई, माई, गवई, समई, मलई, पवई,
६. कविता, शिरीष, विहीर, मासळी, विलास, खारीक, जावई
७. पडली, चढली, बसली, हसली, रमली, ठरली, आणली
८. चालली, तारली, सावली, विरली, बदलली, मळली, चावली
९. निजली, वाचली, रचली, भिजली, कापली, छापली, मापली, समजली.

[ टीप :– शेवटच्या ओळीतील शब्दांत ली-पूर्वी 'सुलभुक' येतो. ]

## गृहपाठ पाचवा

(आ) १. एकटे, एडके, एवढे, फेरे, पेले, मेघे, मेळे.
२. आवडे, वेळी, वेणी, शेणी, तेथे, खेडे.
३. केशर पाशवी, तेवढे, काळे, जेवढे, शिळे, कळे,
४. घेते, दैना, पैसे, वैरी, ऐकीव, दैवी, घैसास.
५. वैनी येते नी हैदरची मैना बघते.

## जलद वाचन पाठ १

१. मी येते, ती येते, हा धर, ही धर, हे धर.
२. मी खाते, ती खाते, हा धरा, ही धरा, हे धरा.
३. या माळा या शाळा, या बाई, हात हलवा, पाय हलवा.
४. मी गाते, ती शिवते, खाली बसते, चहा पिते, सही घेते.
५. ती पडली, ते पडले, हा दिसला, ही दिसली, हे दिसले.
६. पमी लपते, हसीना भाजते, मेरी छापते, मी कापते, ती मापते.
७. रामा आला, बावा आले, नाना आले, ताई झाली, ते झालें.
८. आशा बसली, आरा बसली, ते बसले, पैसे दिले, हार घातले.

९. दारे लावली, ताटे भरली, कामे सरली, मजा वाटली, नीज आली.
१०. मला आले, मला वाटले, तिला दिसले, तिला भावले, तिला वाटले,.
११. ती येता जाता हसते, मी जे जे बघते ते ते घेते.
१२. आई हलली, बाबा हलले, चिमा चालली,
इशारा केला जाता जाता.

## गृहपाठ सहावा

१. उजवा, उटी, उडी, उतार, उताणा, उघडे, उनाड.
२. उगाच, उपास, उदास, उमाठा, उलटी, उधारी, उभय, मुसळ.
३. उचकी, ऊर, उशी, उमेश, उभारी, ऊबदार, उशीर, उकल.

४. कूस, फूस, सुख, भूक, झूल, धून, सूळ, दूत.
५. जरूर, रफू, थुकी, कूट, जादू, शूर, विठू.
६. भुवई, चाहूल, सुतार, तराजू, फुकट, बुरुज, सुटका.
७. समजू, निघू, ठेवू, देऊ, वाचू, पडू, खेळू.
८. धूम, पूर, नुसता, पुजारी, शेपूट, सूचना, लालूच.
९. येऊ, जेऊ, दिसू, पाऊस, पाऊल, घाऊक, दाऊद.

## गृहपाठ सातवा

१. ती नाचते; तो नाचतो; मोर नाचतो; मी गातो.
२. पोपट चोच मारतो; चोर कुलुप फोडतो; दिवस जातो.
३. विजय येतो; मी बसतो; दोर हलतो*; ढोल वाजतो.
४. मी उचलू* लागलो; मी बघू लागलो; ते चालू लागले.

५. मी गेलो; मी जेवलो; मी खेळलो; मी झोपलो*

६. तो नगरला कामासाठी येऊन जाऊन असतो.

७. तू सकाळी लवकर उठून येऊन तिला घेऊन जा.

८. तो घरून आला आणि काम करू लागला.

* सुलभुक

## गृहपाठ आठवा

१. यौवनातील हौस; कौलारू घरे; फौजदारी चौकशी.

२. पौषातील गारवा*; चौफेर नजर; चौधरीचे कौतुक.

३. आम्ही येतो; आम्ही बसतो; तुम्ही येता; तुम्ही बसता.

४. तो आला; ते आले; आम्ही आलो; तुम्ही आलात.

५. चव्हाणाचा मेव्हणा; तुम्ही म्हटले; आम्ही म्हटले.

६. नवी* तऱ्हा; कोल्हापूर जिल्हा; शहराचा ऱ्हास.

७. तुझे लक्ष; माझे लक्ष; आमचे शिक्षण; गावाचे रक्षण.

८. ज्ञानाची कक्षा; विज्ञानाची भरारी; तज्ज्ञ*; सुज्ञ.

## गृहपाठ नववा

१. अधिक अपेक्षा; अशिलाला अटक;असला अनुभव; अनेक अडचणी;

२. अतिशय कठीण; अधिकार लालसा; अपमानाचा बदला;

३. असे असताना; तिकडे जाताना; तेथून येताना; तुला वाटला.

४. मी आहे; ताई आहे आणि दादा आहेत; बाबा नाहीत आणि काका नाहीत.

५. मला एक भाऊ आणि एक बहीण; तुला किती आहेत ?

६. अजयने घेतला; तिला मिळाला; मला दिसला; तुला वाटला.

७. चालता चालता तो थकला. माझी हसून हसून पुरेवाट झाली.

८. मग सुनीलने बघता बघता ऐंशी धावा काढल्या.

## गृहपाठ दहावा

जुन्या पुण्याच्या; पाण्याच्या टाक्या; छोट्या मोठ्या गाड्या.
डाव्या व उजव्या बाजू; मुली आल्या. खेळल्या व झोपल्या.
त्याने आज सकाळी येऊन बघितले; तिला जागा फार आवडली.
सह्या झाल्यावर हे सारे कागद जिल्ह्याच्या ठिकाणी जातील.
जमिनी भाजल्या आहेत; त्यामुळे पाऊस लवकर आला तर बरे.
आपल्या शूर जवानांमुळे मागील लढाईत भारत विजयी झाला.

## जलदवाचन पाठ २

(१) भारत व रशिया या दोन देशांत झालेल्या करारानुसार, रशियाने भारताकडून दरवर्षी पाचशे टन काजू व इतर काही वस्तू आयात करावयाच्या आहेत. भारताने रशियाकडून लांब धाग्याचा कापूस, काही तयार औषधे व शिक्षणोपयोगी वस्तू घ्यावयाच्या आहेत.

(२) नाशिक शहर गोदावरी नदीकाठी वसलेले आहे. पावसाळ्यात जेव्हा चार चार दिवस पावसाची सतत धार चालू असते तेव्हा तीन वर्षांतून एकदा तरी नदीला मोठा पूर येतो आणि गावाच्या सखल भागातून पाणी पसरते. त्यामुळे कधीकधी जुनी घरे पडल्याने, गुरे वाहून गेल्याने आणि इतरही बरेच नुकसान झाल्याने लोकांचे फार हाल होतात.

(३) सुधा, विजया, व झरीना काल सकाळी बागेत गेल्या होत्या. मी सुद्धा, आईला विचारून, त्यांच्याबरोबर गेले होते, आम्हांला परत नेण्यासाठी बाबा दुपारी चारच्या पुढे येणार होते. पण बराच वेळ वाट पाहूनही ते आले नाहीत तेव्हा आम्ही कंटाळलो आणि चौघीजणी एकट्याच उशिरा घरी परतलो.

(४) शेवटी त्या आघाडीवरील तुकडीतील काही सैनिक साथीच्या रोगाने आजारी पडले. त्यांच्यावर औषधोपचार करण्यासाठी आम्हांला आदेश आले तेव्हा मी आणि माझे चार सहकारी तेथेच जाऊन पोचलो. आठवडाभर तेथे राहून साथ आटोक्यात आल्यावर आम्हाला परत जाण्यास परवानगी मिळाली.

## गृहपाठ अकरावा

१. औरंगाबाद व नांदेड येथील ४५ कामगार संपावर आहेत.
२. बंदुकीच्या आवाजाने जागा झाल्यावर सिंह चवताळून पुढे आला.
३. मुंबईपासून गोंदियापर्यंतच्या प्रवासात जंगले आढळली नाहीत.
४. दोन गुंडांच्या भांडणाचा लाभ तिसऱ्याने उठवला.
५. पंधरा दिवसापासून चालू असलेले उपोषण अखेरीस काल संपले.
६. बांधकाम चालू असल्याने यंदा शाळेची वेळ सकाळची राहील.
७. गांधी मंदिराच्या उंबरठ्यावर साप-मुंगसाची झुंज सुरू झाली.
८. संस्थेच्या संचालकांची ओंजळभर फुलांनी आदरांजली वाहिली.

## गृहपाठ बारावा

१. सकाळी ती वाचीत होती तेव्हा तिचा भाऊ बाजूला खेळत होता.
२. असले तात्त्विक विचार तुम्हाला आवडणार नाहीत असे मला वाटते.
३. ज्या वर्षी उन्हाळा जास्त होतो त्या वर्षी पाऊस खूप पडतो.
४. आपण कशाबद्दल बोलत आहोत याची तिला शेवटपर्यंत जाणीव झाली नाही.
५. 'सांगणारा एक तर ऐकणारे दहा' असे ती काल म्हणाली.
६. जेवणात माशाचे काटे अडकले असे सहसा होत नाहीत म्हणतात.
७. खेडेगावात सरकारी अधिकारी व गुंड आम्हाला छळतात.

## गृहपाठ तेरावा

१. भाषणात त्यांनी आपल्या लहानपणची सांगितलेली आठवण रंजक होती.
२. भंडारा येथील एका जैन मंदिरात एक लाखाची चोरी झाली.

३. आपला देश शेतीप्रधान आहे; म्हणून शेतकामासंबंधी संशोधन झाले पाहिजे.

४. संशोधन म्हणजे कठीण गोष्ट आहे असे मुळीच वाटता कामा नये.

५. आपल्या दैनंदिन जीवनातील साध्या गोष्टीच कधी कधी कठीण भासतात.

६. शिक्षणाची संधी आता सर्वांना मिळते; गरिबांची मुलेही शिकतात.

७. गेल्या काही वर्षांत साठीच्या पुढे गेलेल्यांची संख्या वाढत आहे.

८. माणसाने आपल्या आवडीच्या विषयावर लक्ष केंद्रित करावे.

९. शहरातील जे लोक सुशिक्षित आहेत त्यांना हे करता आले पाहिजे.

१०. अशांनी आपल्या मुलांची खास काळजी घेतली तरी बरेच काम होईल.

## गृहपाठ चौदावा

१. मागील महिन्यातील माझी दोन पत्रे तुला मिळालेली दिसत नाहीत

२. आलेल्या दोन गृहस्थांना समुद्रकाठची वनश्री फार आवडली.

३. कोणतीही आकृती काढण्यापूर्वी तिचा आराखडा तयार असावा.

४. महाराष्ट्र व सौराष्ट्र दोन्ही सागरी राज्ये पश्चिमेस आहेत.

५. संसदेत सर्व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर प्रथम पं. प्रधान निवेदन करतात.

६. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताची सर्व क्षेत्रांत प्रगती झाली आहे.

७. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे श्री. धीरेंद्रसिंगना लवकरच जावे लागले.

८. दरवर्षी होणाऱ्या राज्यातील क्रीडास्पर्धा आकर्षक असतात.

९. सुदृढ प्रकृतीची माणसे राष्ट्राची सेवा चांगल्या प्रकारे बजावतात.

१०. पैशापेक्षा हृदयाची श्रीमंती माणसाला श्रेष्ठ प्रतीचे यश मिळवून देते.

## गृहपाठ पंधरावा

अर्थात ही गोष्ट अजून मी कोणालाच सांगितली नाही. अर्थमंत्र्यांनी यापूर्वी जाहीर केलेली कर-योजना चांगली आहे. निर्वाचन अधिकाऱ्याने काल प्रसिद्ध केलेला निर्णय अपरिवर्तनीय आहे. ब्रिटिशांचे राज्य असताना झालेल्या सुधारणांपैकी ही एक. उद्या सकाळी तो इकडे येईल तेव्हा आपल्या वस्तू नेईल. वृत्तपत्र विधेयकाचे समर्थन करणारांचा मुखभंग झाला. आपल्या कामात हलगर्जीपणा अथवा दुर्लक्ष करणारे सर्व दोषी आहेत. कापड विरेल पण शिवण उसवणार नाही असे शिंपी सांगत होता. बोलेल ते करील काय आणि गर्जेल ते पडेल काय? नर्मदा नदीच्या पात्रात एक बस पडून चाळीस माणसे बुडाली.

## जलदवाचन पाठ ३

भारतीय गिर्यारोहण संस्थेचा रौप्य महोत्सव नुकताच साजरा झाला. २७ ऑगस्ट ८३ पासून तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाचे उद्घाटन. पं. प्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी केले. त्या वेळी जगातील सर्वांत उंच पर्वत शिखर एव्हरेस्टवर माणसाचे पहिले पाऊल उमटवणारे श्री. तेनसिंग नोर्गे यांचा पंतप्रधानांच्या हस्ते खास सत्कार करण्यात आला. एकोणसत्तर वर्षांचे तेनसिंग आपला सन्मान स्वीकारण्यासाठी व्यासपीठावर जाण्यास निघाले, तेव्हा समारंभास उपस्थित असलेल्या एक हजाराहून अधिक लोकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. उपस्थितात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत गिर्यारोहक, संरक्षण दलप्रमुख, देशोदेशींचे राजदूत आणि इतर अनेक प्रतिष्ठित निमंत्रित यांचा समावेश होता. उद्घाटनाच्या आपल्या भाषणात पंतप्रधान म्हणाल्या 'सर्वच क्षेत्रांत, विशेषतः आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञान आणि धैर्य यांचा समन्वय साधला पाहिजे.' नागरिकांना असे आवाहन करून पं. प्रधान पुढे म्हणाल्या "आम्हा भारतीयांच्या दृष्टीने हिमगिरी ही केवळ पर्वतराजी नाही तर ती आमच्या सद्सद्विवेक बुद्धीचा अविभाज्य घटक आहे".

२. भविष्यनिधीचे कार्यालय मुंबईस बान्द्रे येथे आहे. निवृत्त झालेल्या वृद्ध व इतर कामगारांचे वेतन बंद झाल्यावर आपला जमलेला निधी महिनाभरात मिळावा अशी त्यांची रास्त अपेक्षा असते. पण सहा सहा महिने कार्यालयात सारखे खेटे घालूनही ही अपेक्षा पुरी होत नाही. आयुष्यभर जमा झालेले स्वत:चे पैसे वेळेवर मिळत नाहीत आणि त्यांच्या कुटुंबांची उपासमार सुरू होते. तेव्हा कामगारांना नाइलाजाने पडेल त्या महागडया व्याजदराने कर्ज घेऊन गुजराण करावी लागते. यासंबंधी अनेक तक्रारी झाल्या, वृत्तपत्रांतून नावनिशीवार तपशील देऊन श्रमिकांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे प्रयत्नही झाले. पण तेथील कार्यालयीन कर्मचारी कशालाही दाद देत नाहीत. आता लोकप्रतिनिधींना हा प्रश्न हाती घेतल्याशिवाय तरणोपाय दिसत नाही.

[टीप :—यानंतरच्या जलदवाचन पाठांचे बाळबोध लिप्यंतर पुस्तकात दिलेले नाही.]

---

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/234/9
मंत्रालय.